
# श्री साईलीला



स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचें
मोत्यांचें
सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं.
२९६३१



# श्री साई वाक्सुधा

संतांचें महत्म्य शब्दांनीं वर्णन करून सांगतां येणार नाहीं. तें अगाध आहे. संतांच्या सान्निध्यांत मरण येणें यासारखें भाग्य नाहीं. त्या मृतानें जीं नाना पापें केलीं असतील त्याचीं संतसमागमामुळें राखरांगोळी होऊन जाईल. तो मनुष्य जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटला, त्याला वैकुंठसुख प्राप्त झालें म्हणून समजावें. लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला असतां त्याचें सोनें होतें नाहीं का ? तसाच हा प्रकार आहे. यासाठीं संतसमागमांत नेहमीं रहाण्यासाठीं झटावें.

—श्रीसाईसच्चरित्


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ] मार्च १९६६ [ अंक १२ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३२६१

: कार्यालय :

साई केतन, डॉ आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

श्रीरामकृष्ण परमहंस यांना एका भक्तानें असा प्रश्न विचारला कीं, "आमचें मुख्य कर्तव्य कोणतें बरें ?"

रामकृष्ण म्हणाले, सदैव देवाशीं संबंध जोडून रहाणें, त्याचा विसर कधींही पडूं न देणें, हेंच आपलें मुख्य कर्तव्य.

आपल्यापुढे दोन मार्ग आहेत, एक कर्मयोग व दुसरा मनोयोग.

संसारी माणसें कर्मयोगाच्याद्वारें म्हणजे त्यांचें जें नियत कर्तव्य असेल तें मनापासून व इमानें इतबारें पाळण्याच्याद्वारें तो योग साधीत असतात.

ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ व संन्यास या आपल्या जीवनाच्या चार प्रमुख पायऱ्या आहेत. कांहीं ना काहीं उद्देश मनांत बाळगून तो प्राप्त व्हावा म्हणून कर्म करायचें हें उद्दिष्ट संन्यास दीक्षा घेतलेल्यानीं अजिबात टाळलें पाहिजे. त्यानीं आपलीं रोजची कामें करावी, परंतु त्याचें अमूक फळ मिळालेंच पाहिजे ही आकांक्षा सोडून दिली पाहिजे. सन्याशाने सर्व गोष्टींचा संन्यास घेतला पाहिजे. त्यानें सदैव त्याच्या सान्निध्यांत रहाण्याचा, त्याचें स्मरण करण्याच्या वृत्तीत राहिलें पाहिजे. माझें पोट कसें भरेल, मी कुठें राहीन याची चिंता सोडून दिली पाहिजे. भिक्षा हेंच त्याचें पोटाचें साधन. जागा मिळेल तेथें पडायचें. कशाचाही लोभ बाळगायचा नाहीं. तीर्थयात्रा, नामजप, पूजाअर्चा हेंच त्याचें सर्वस्व असावें.

तुमच्या वांट्याला कोणतेही कामधाम आलेले असो. हलके असो, श्रेष्ठ असो. तें प्रामाणिकपणें करीत असतां, त्याच्या फळाबद्दल तुम्ही निश्चिंत असलें पाहिजे. फळ देवाच्या हातांत. त्याची विवेचना तुम्हीं नाहीं करायची. देव काय करायचें तें करील. तुम्हीं फळाची अपेक्षा न करतां आपल्या हातांतील काम पार पाडण्यासाठीं मनापासून झटायचें.

दुसरा एक मार्ग सांगितला आहे. कोणता ? मनोयोग ही एक मोठीं साधना आहे. त्या साधनेंत जो कोणी गुंतलेला असतो त्याच्या हालचालीची बाहेर कांहीं-एक चिन्हें दिसत नाहींत. त्यानें मानसिक दृष्टया देवाशीं आपलें संधान बांधलेले असतें. शुकदेव यांनीं तोच मार्ग स्वीकारला होता. अशीं आणखीं पुष्कळ उदाहरणें सांगतां येण्यासारखीं आहेत. त्यांनीं स्वतःच्या जीवितासंबंधीं काळजी सोडलेली असते. लक्षच नसतें त्यांचें देहाकडे. केस वाढताहेत, दाढी वाढत चाललेली असते. लक्षच कुठें असतें त्याचें बाह्यांगाकडे !

एखादा साधक पायरी पायरीनें जेव्हां परमहंस पदापर्यंत पोहोंचतो तेव्हां त्याला कशाची शुद्धि रहात नाहीं. सारें गळून पडतें. त्याच्यापुढें एकच गोष्ट सतत असते.

त्याचें आराध्य दैवत. त्याच्यावर त्याचें सारें लक्ष खिळून गेलेलें असतें. मनानें तो देवाशीं एकरूप झालेला असतो. तो स्वतःसाठीं कांहीं करीत नाहीं. कांहीं केलेंच तर दुसऱ्यांचें मार्गदर्शन.

कर्मांच्याद्वारें भक्त ईश्वराशीं एकरूप होऊं शकतो किंवा मनाच्याद्वारें तो त्याच्या सान्निध्यात सदैव राहूं शकतो. भक्ति ही अजब अमृतवल्ली आहे, तिच्यामुळें तुमच्या अंतःकरणात प्रकाशाचा प्रवेश होऊं शकतो.

भक्तीचा पारा जसजसा चढत जाईल तसतसे तुम्हीं सुखासाविद्ध जाऊं लागाल. मग कुंभकाचा अनुभव तुम्हीं घेऊं शकाल. मनाची जेव्हां संपूर्णपणें एकाग्रता होते तेव्हां असीम शांततेचा भक्ताला अनुभव येऊं लागतो. आपल्या श्वासोच्छ्वासावर परिणाम घडून येतो. सर्वत्र शांत, शांत भासूं लागतें. बुद्धि प्रगल्भ होते. त्या बुद्धीला सूक्ष्म धार येते. तिच्याद्वारें आरपारचें सर्व कांहीं दिसूं लागतें.

ज्याच्या वांट्यास हें सामर्थ्य येतें त्याची त्याला कांहींच जाणीव नसते.

तेव्हां भक्तियोगाच्याद्वारें माणसाला सर्व कांहीं साध्य करून घेतां येतें. त्याची जो कांस धरील तो तरला म्हणून समजावें.

भगवान रामकृष्ण पुढें स्वानुभव सांगतांना म्हणतात, “मी जगन्मातेपुढें तिच्या भेटीसाठीं रडरड रडलों आहे. अगदीं ओक्साबोक्सीं रडलों आहे.” म्हणत असें कीं, “हे माते जें तुझें रूप योग्यांना आकलन करतां आलें तें मला आकलन करतां येऊं दे. मला कडकडून मिठी मारून तुला एकदां भेटूं दे.”

माझें तें अंतःकरणापासून बाहेर पडलेलें आक्रंदन ऐकून मातेच्यानें मला भेटल्याशिवाय रहावलें नाहीं.

जो भक्त अगदीं अंतःकरणापासून मातेला हांक मारतो तिच्या हांकेला ती ओ दिल्याशिवाय रहात नाहीं. ती आपल्या भक्ताला भेटण्यासाठीं धावत लगबगीनें येते.

जगन्माता माझ्या हांकेसरशी मला येऊन भेटली आणि तिनें माझी सारी कोडीं सोडवलीं. वेद, शास्त्रें, पुराणें तंत्र मंत्र सारें कांहीं तिनें मला उलगडून दाखविलें. माझ्या सर्व शंकांचें निरसन केलें.

श्रीरामकृष्णानीं सांगितलेला हा स्वानुभव प्रत्येकानें आपल्या अंतःकरणावर कायमचा कोरून ठेविला पाहिजे. एवढेंच नव्हे तर तो आचरणांत आणण्यासाठीं प्रत्येकानें मनापासून झटलें पाहिजे. त्यांतच जीवनसाफल्य आहे. हा जीवनसाफल्याचा महामंत्र आहे. श्रीसाईबाबानीं आम्हां भक्तांना हा मंत्र परोपरीनें जीवनभर सांगितला. ज्यानीं त्याचें आचरण केलें ते तरले, त्याप्रमाणें त्याच मार्गानें जाण्याची बुद्धि साई-कृपेनें तुम्हां–आम्हां सर्वांना होवो हीच प्रार्थना.

# " अंतीम शोध "

लेखक : केशव कृष्ण प्रधान

माणसाच्या नित्याच्या धडपडींतून व मनांत उद्‌भवणाऱ्या नानाविध कल्पनांतून त्याचा अंतीम शोध कसला चाललेला असतो, याविषयीं विचार केला तर कोणाचीही मती गुंग झाल्याशिवाय रहाणार नाहीं. नेहमीच्या आयुष्यांत पाहिले तर चिंता, भीति, व्यग्रता, मानसिक दौर्बल्य, नानातऱ्हेचे रोग, दारिद्र्य, जरा व मृत्यु या सर्व दुःखांचा विचार करिता क्षणोक्षणीच्या आयुष्यामध्यें सुख अंशमात्र तरी असते किंवा नाहीं ह्याबद्दल शंका वाटते. तरीदेखील त्या कल्पिलेल्या किंबहुना त्याच्या अस्तित्वाविषयीं शंका आहे, अशा सुखाच्या लवलेशासाठीं प्रत्येकजण आयुष्यात अनंत यातायातीतून जात असतो. त्यातच भर म्हणजे सर्व गोष्टीविषयीं अनिश्चितता असल्याकारणानें तो सुखाचा लवलेश मिळत आहे असें समजले तर तें सुख वाढण्याची गोष्ट तर बाजूलाच राहो, पण तें सुख किती वेळ टिकेल हा त्याला संभ्रम पडतो. कधींकधीं असें वाटते कीं, मानवाला केवळ फसविण्यासाठीं अथवा त्याची क्रूर चेष्टा करण्यासाठीं, त्याला जन्माला घातले असावें, व हा त्याचा जन्मदाता व मग तो निसर्ग असो किंवा देव असो, तो राक्षसीवृत्तीचा असावा. आयुष्य आहे तोवर निरर्थक त्याच त्याच गोष्टी करून या विशाल पृथ्वीतलावरील एक क्षुद्र मानव आपली स्वतःचीच दांडगी फसवणूक तर तो करून घेत नाहींना, असा संशय वारंवार मनात डोकावतो. गेला तो दिवस आपला, व आला तो दिवस कसा जाणार याच निराशजनक वृत्तीचा अवलंब करून माणसें जीवन कंठीत असतात असें वाटतें.

प्रत्येक माणसाच्या जीवनांत त्याच्या ओळखीचा असा एक लहानसा कालखंड असतो. बालपणची बरीच वर्षे सर्वसाधारण अज्ञानातच जातात. तारुण्यात जरा कुठे आयुष्याविषयीं नीट विचार करण्याची कांहीं वर्षे जातात न जातात तोच त्याला मृत्यु भेडसावू लागतो. ना आगा ना पिछा या परीस्थितींत आयुष्यांत केलेल्या धडपडीना कितीसा अर्थ असणार! जगत आहोत तोपर्यंत नीट आयुष्य जावे, मृत्युनंतर कोणी पाहिलें आहे! व त्यावर विचार करून तरी त्यातून निष्पन्न काय होणार! एवढ्या जगड्व्याळ विश्वाचा विचार माझ्यासारख्या क्षुद्र मानवाला करता येणे शक्य नाहीं. साधूसंत परमेश्वर परमेश्वर म्हणतात तो खरोखरच आहे किंवा नाहीं! याविषयीं विचार करूनसुद्धा मला त्यांतील कांहीं कळणें शक्य नाहीं. मग त्या भानगडींत पडा कशाला! आली वेळ सरली म्हणजे पुरें!

एवढाच विचार करून मानव जर थांबत असता तरीही पुष्कळ बरे झाले असते. परंतु या तऱ्हेनें आपल्या वांट्याला आलेले आयुष्य कल्पीलेल्या सुखसमाधानांत जर त्याला घालविता आले असते तर तो हजारो जीवजंतु ज्याप्रमाणें जन्माला येतात व मरतात त्याप्रमाणें सुखानें जगला असता व मेला असता. परंतु तेही त्याच्या नशिबांत ठेवले नाहीं. आहे या परिस्थितिपेक्षां जास्त चांगली परिस्थिती मला असावी, मला जें मिळत आहे त्यापेक्षां जास्त मिळावे, माझ्या एकामागून एक वरचढ उत्पन्न होणाऱ्या सर्व वासनाची तृप्ती व्हावी, या ईर्षेनें मानवांच्या जीवनांत केवढी भयंकर घडपड चाललेली असते ! व त्यामुळें तो या मानलेल्या सुखाला देखील आंचवतो !

या सर्व गोष्टींचा विचार केला असता 'धरले तर चावतें व सोडलें तर पळतें' अशी माणसांची जीवनामध्यें स्थिती होते. परंतु आपल्याला कांहींतरी कधींही न नाहींसा होणाऱ्या सुखशांतीचा लाभ व्हावा असें सदेव त्याला वाटत असतें. त्याच्या सर्व घडपडीचा हा एकच निष्कर्ष काढतां येतो. जगांचें कांहींहि बरें वाईट होवो मी मात्र पूर्ण सुखी झालों पाहिजे हाच माणसाचा हट्ट आहे. आम्हांला परसुखांसाठी घडपडावयाचें आहे, कांहीं राजकीय किंवा सामाजिक सुधारणा करावयाच्या आहेत, आमच्या देशाचा इतिहास उज्वल करावयाचा आहे, मानव जातीचा उद्धार करावयाचा आहे, वगैरे ध्येयें मानवांच्या मनांत खोल उतरली तरीदेखील, त्याचा हें सर्व करण्यामागील उद्देश स्वतःला सुखी करण्याचा असतो असेंच आपल्याला दिसून येईल.

मनुष्यांचे खरोखर त्याच्या स्वतःवरें इतकें प्रेम असते कीं स्वतःशिवाय त्याला दुसरा कोणीहि प्रिय नसतो, हें सत्य आहे. उपनिषदात् या सत्याला दुजोरा दिला आहे. तेथें स्पष्टच लिहिलेलें आहे की, मानवाला त्याची प्रत्यक्ष बायका, मुलें, घरदार, संपत्ति वगैरे सर्व गोष्टी आपल्या स्वतःसाठीं म्हणजे स्वतःच्या सुखासाठीं हव्या असतात. सत्य हें नैसर्गिक असते. तेव्हां त्या सत्याला सोडून कुणीहि वागूं शकत नाहीं. त्याचा अर्थ आमचे सर्व समाजसेवक, राजकीय कार्यकर्ते किंबहुना जगत्‌वंद्य अशा सर्व विभूती स्वतःवरच प्रेम करीत आल्या आहेत. त्याच्या जीवनाचा सर्व खटाटोप जरी मानवें जातीच्या कल्याणासाठीं वरवर दिसला तरीदेखील तो शेवटीं स्वतःच्याच कल्याणासाठीं असतो. या सकृतदर्शनी दिसणाऱ्या विसंगतीचे निराकारण कसें करावयाचें ?

माणूस स्वतःवर खरोखर जाणूनबुजून प्रेम करतो का ? तो जर त्याच्या नकळत स्वतःवर प्रेम करीत असेल तर मला वाटतें त्यानें जाणूनबुजून स्वतःवर खऱ्याखुऱ्या अर्थानें प्रेम करावयास शिकलें पाहिजे. म्हणजे ही विसंगती रहाणार नाहीं. आपण आपल्यावर खरें प्रेम करावयाचें म्हणजे काय करावयाचें ? याचा अर्थ असा कीं, आपल्याला मनापासून खरोखर काय करावयास आवडते कीं ज्यापासून आपल्याला सुख मिळेल ! याचा त्यानें नीट खोलवर विचार करावयास पाहिजे. हा विचार करीत असतांना आपल्या जीवनावर ज्या नीतितत्त्वांचा परिणाम

झाला आहे, किंवा होऊं पहात आहे त्या सर्व नीतितत्वांचा अंतीम अर्थ काय आहे. ती आपल्याच सुखासाठी आहे का दुःखासाठी आहे हे नीट तपासून पाहिले पाहिजे. चारचौघात बरें दिसावे, चारचौघांनी आपल्याला चांगले म्हणावे, या केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपण नीतितत्वे पाळत आहोत का या नीतितत्वाच्या पालनामुळें आपलाच फायदा होतो, या गोष्टीकडे आपण नीट लक्ष देऊन पाहिले पाहिजे. मनांत वागावयाचें आहे एका तऱ्हेनें, पण वागत आहोत दुसऱ्या तऱ्हेनें असें का होते हा प्रश्न आपण आपल्याला विचारायला पाहिजे. उदा. आपण आपल्यावरील विशेषतः आर्थिक जबाबदारीचे फार मोठे स्तोम माजवितो. आपल्याला मिळणाऱ्या मर्यादित अर्थप्राप्तीत आपण आपला संसार चालवून इतरहि कोणास मदत करिता आली तर ती करू पहातो. आतां ही मदत आपण चारचौघांत बरी दिसते म्हणुन करतो, की, खरोखर ज्या कारणास्तव आपण मदत करतो त्या कार्यावर आपले प्रेम असते म्हणुन करतो ? ज्या इसमाला आपण मदत करतो त्याचे बरें व्हावे म्हणुन मदत करतो, का त्यानें आपल्याला बरें म्हणावे म्हणुन मदत करतो ? अशा एक ना अनेक प्रश्नामागील आपला खराखुरा हेतु जर आपण शोधून काढला तर आपले खरे स्वरुप आपल्याला कळून येईल. अशाच तऱ्हेचा ढोंगीपणा आपल्या वागणुकीत आपण नीट विचार केल्यास आपल्याला दिसून येईल. हीच दृष्टी जर आपण आपल्यामध्यें निर्माण होणाऱ्या काम, क्रोध, मद, मोह मत्सर या विकाराकडे वळविली तर आपल्याला असें आढळून येईल की आपण क्षणाक्षणाला त्या विकारांच्या स्वाधीन होत असतो व त्यापासून होणाऱ्या सुखाकडे किंवा दुःखाकडे मनांमध्यें सारखे ओढले जात असतो. परंतु आपल्या मनामध्यें अशा तऱ्हेच्या विकारांचे धुम्मळ युद्ध चालले आहे हे बाहेर समाजाला न कळविण्याची आपण खबरदारी घेत असतो, हा सर्व खटाटोप घरीं, दारी, चारचौघांत, आपलें नांव खराब होऊन नये या करितांच निव्वळ असतो. परंतु या सर्व गोष्टींचा जर अत्यंत खोलवर विचार करावयास आपण शिकलो तर आपल्याला खात्रीनें अंतर्यामी खुपच मोकळे वाटू लागेल व आंत एक आणि बाहेर एक अशी नित्य अनुभवाला येणारी आपल्या मनांची गुदमरलेली अवस्था नाहीशी होईल. तेव्हां जसे शरीरानें पेलेल तेवढेच वजन माणूस उचलतो तसेंच मनानें पण जेवढी स्वाभाविक नीतितत्वें आपल्याला पेलता येतील तेवढीच आपण आचरणांत आणू. उगीच मीं असा आहे, व मी तसा आहे—नव्हे मी सर्व सद्गुणांचा पुतळा आहे असें चारचौघांत दाखवित आपण मिरविणार नाहीं. आपल्या मानसिक मर्यादा आपण

ओळखून आपण आपल्या स्वतःशी तरी या मर्यादा कबूल करू. आपल्या सर्व मानसिक दुःखाचा उगम आपल्या मनांतच आहे. परंतु सवयीमुळें व समाजातील प्रतीष्ठेसाठीं धडपडण्यामुळें आपण त्या दुःखाला बाहेरील परिस्थिती कारणीभूत होत आहे असें दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. खरें पाहिले असतां आपल्या भोवतालचे चिमुकले जग आपल्याच मानसिक निर्मितीचा एक भाग असते. जसे आपण तशीच भोवतालची परिस्थिती. हा अनुभव आपल्याला पदोपदी येत असून सुद्धां आपण दोष भोवतालच्या परिस्थितीला देत असतो. आपल्या--स्वतःला देत नाहीं त्यामुळें आपल्या दुःखाचा निरास करण्याचे आपण पदोपदीं--नकळत टाळीत असतो. दुसऱ्याचा द्वेष करणाऱ्या माणसाला, दुसरें लोक माझा द्वेष करीत आहेत असें वाटतें. लोभी माणसाला सर्व जग लोभी आहे असें भासते. गर्विष्ठ माणसाला दुसरी माणसे फार गर्विष्ठ आहेत असा भास होतो. निंदा करणाऱ्या माणसाला लोक आपली निंदा करीत आहेत असें उगीचच वाटते. अशा तऱ्हेनें आपण आपल्या भोवतालचे चिमुकले जग धुसर धुरकट करून स्वतःला त्यांत गुदमरून टाकीत असतो. बाउलट आनंदी माणसाला जगांत सर्व बाजूला आनंदच पसरला आहे असें सारखें वाटत असतें. तेंच दुःखी माणसाला सर्वत्र दुःख पसरलें आहे असें विनाकारण वाटून तो आपलें जीवन दुःखी करतो. हा सर्व आपला नित्याचा अनुभव आहे.

मानवी मन हें सदैव गतीमान् असून मानवी विकार ही गती सहस्र पटीनें वाढवितात. तसेंच मानवी मनाला जशी गती द्यावी त्या तऱ्हेची गती मिळते हें वरील उदाहरणावरून आपल्या लक्षात आलें असेलच. मानवी मनांची गती ही एक विशिष्ट वाटोळ्या चाकोरीत फिरत असते किंवा घड्याळाच्या लंबकाप्रमाणें एकदां एका बाजूला तर दुसऱ्यांदां त्याच्या एकदम विरुद्ध बाजूला फिरत असते, असें म्हटलें तरी चालेल. कधीं द्वेष तर कधीं प्रेम, कधीं फुशारकी तर कधीं नम्रता, कधीं सज्जनपणा तर कधीं दुर्जनपणा. मानवी बुद्धी लंबकाच्या सतत गतीला स्थिर करून समतोल राखण्याचा प्रयत्न करतें, परंतु तो समतोलपणा फार वेळ टिकूं शकत नाहीं. मनाच्या या स्थितीमुळें मन बुद्धीमागील एका स्थिर असलेल्या आपल्याच आनंद स्वरूपाला आपण हरघडी मुकतो. कधीं काळीं जर मनाच्या समतोल स्थितीतून आपल्याला या आपल्या दिव्य स्वरूपाचें दर्शन झालें तर आपण चिरकाल आनंदांतच राहूं. परंतु हा समतोलपणा टिकविण्याचें कार्य आपणांस फार दुष्कर आहे असें वाटतें. नीतितत्वें मनांचा हा समतोलपणा टिकवून आपणांस आपणच आनंदी कसें करावें हा मार्ग सतत दाखवित असतात, व तोच त्यांचा खरा उद्देश आहे. तो उद्देश सफल होण्यासाठीं आपण आपल्या विकारांकडे नीट लक्ष लावून पाहिलें पाहिजे. त्यांतच आपलें हित आहे. याचाच अर्थ आपण आपल्यावरच नीट प्रेम करावयास शिकलें पाहिजे. व

हित कशांत आहेत हे समजून घेतले पाहिजे. म्हणजे आपल्या लक्षांत येईल कीं, सत्य–असत्य, राग–द्वेष, काम-प्रेम, या मनाला दिल्या गेलेल्या दोन परस्पर विरोधी अवस्थांच्या मागे तो अमर अविनाशी आनंद कायम स्वरूपात आपल्याच ठिकाणी वास करीत आहे व त्याचा बाहेरील परिस्थितीशीं कांहींएक संबंध नाहीं. बाहेरील परिस्थिती, बाहेरील परिस्थिती, ही आपली खोटी ओरड आहे, खोटे ढोंग आहे.


जगांतील सर्वश्रेष्ठ विभूती याच आनंदाचा आश्रय घेऊन श्रेष्ठपदाला पोहचल्या. त्यांच्या अंतरंगातील अविनाशी आनंदाशिवाय, त्यांनीं बाहेरील परिस्थितीची कोणत्याहि तऱ्हेची क्षिती बाळगली नाहीं. निंदा–स्तुति, श्रीमंती–गरीबी, जीवन–मृत्यु, या द्वंद्वा-मागील केवळ अविनाशी स्वरूपासाठींच ते जगले व त्या अनुषंगानें जे पद त्यांस मिळाले, त्यांतच समाधान मानले. तीच त्यांच्या जीवनाची इतिकर्तव्यता ठरली.

मानवाच्या अंतिम शोधाची ही फलश्रुति आहे.

---


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यांसाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यांसाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जामळी मोहल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# भगवद्भक्त कबीर

## [ उत्तरार्ध ]

कोणे एके प्रसंगीं प्रहर रात्रीच्या सुमारास कित्येक संतजन पाहुणे म्हणून कबिराच्या घरीं अकस्मात् आले. कमालानें लागलीच त्याना सत्कारपूर्वक बसण्यासाठीं आसन घातलें. भलत्याचवेळीं इतके साधू आलेले पाहून कबिराच्या पत्नीस मोठा उल्हास वाटला. मोठमोठ्या वेदांताच्या बाता मारून, दारामध्यें भिक्षेस आलेल्या भिकाऱ्यास शिव्यागाळी घालून आपल्या विद्वत्तेची पूर्तता करून दाखविणाऱ्या पोटभरू पंडिताप्रमाणें कबीराची वृत्ति नुसती लौकिकी नसल्यानें संतांचा तांडा दारांत उभा राहिलेला पाहून कबिरास पूर्ण समाधान वाटलें. दिव्यामध्यें तेलवात घातली असतां तो जसा तेजःपुंज दिसतो तसा त्या साधुसंतांच्या आगमनानें कबिरदास हर्षयुक्त दिसूं लागला. त्यानें कांहीच न करितां आपल्या पत्नीला स्वयंपाक करण्यास सांगितलें. कबिराच्या घरांत एक पसाभर धान्य सांपडण्याचीही मारामार होती. तेव्हां कबिराची आज्ञा पूर्ण करण्याबद्दल त्याच्या त्या साध्वी स्त्रियेला मोठें संकट प्राप्त झालें. साधुजनांना तसेंच उपाशी ठेवावें तर सत्वहानी होण्याचें भय वाटूं लागलें. तेव्हां विचार करून ती कुलवंत कामिनी आपल्या भ्रताराम्स म्हणाली, "घरांत मूठभरही धान्य नाहीं. विकत आणावें तर जवळ द्रव्य मुळींच नाहीं. शेजाऱ्यापाजाऱ्याकडून शिधासामग्री उसनी आणावयास जावें तरी इतकें सामान दरिद्र्याला उसने कोणी देणार नाहीं." बायकोचे भाषण खरें आहे्सें जाणून कबीर विचारांत पडला. मग त्यानें त्या संतांना तसेंच विन्मुख लावलें काय ? एखादी संकुचित अडचण सांगून त्यांना घरांतून खुषीनें हुसकवून लाविलें काय ? नाहीं, नाहीं. अशी गोष्ट कोणी मनांतही आणूं नये. सर्व भूतांच्या ठिकाणीं आत्मभाव ठेवणारा कबीरासारखा महात्मा आपल्या घरांतून कोणालाही विन्मुख परत लावील असें संभवनीयच नाहीं. बायकोच्या सूचनेवरून संतांची तृप्ति करण्याकरितां कबीर-कमालांनीं चौर्यकर्म करावें असें ठरविलें.

कबीरानें लागलीच एक तरवार धारण केली. कमालानें पहार घेतली; आणि कोणाचें तरी घर किंवा दुकान फोडण्याकरितां ही बापलेकांची जोडी घरांतून बाहेर पडली. तो मध्यरात्रीचा समय होता. सर्वत्र निद्रावश झाले होते; अशा वेळीं ते दोघेजण गांवांतल्या पेठेमध्यें प्राप्त झाले. त्या दोघांनीं एका मोठ्या वाण्याचें दुकान फोडिलें. कमाल आंत शिरला आणि कबीर बाहेर राहिला. वाण्याच्या खजिन्याच्या पेटींत पुष्कळ द्रव्य आहे असें कमालाच्या ध्यानांत आलें, पण त्यांना द्रव्याची जरूर नव्हती. आपला

वाडा बांधावा, बायकोच्या अंगावर दागिने घालून तिला पिवळी करून सोडावी, गाड्याघोडी उडवून चैन करावी या बुद्धीनें ते स्तेन–कर्मास निघाले नव्हते. संत–जनांचे आत्मे तृप्त करण्याकरिता त्यांना शिधा पाहिजे होता. पात्रामध्यें अन्नाचे पर्वत वाढले तरी क्षुधार्थी पोटापुरतेंच अन्न खातो, किंवा गंगाबाईच्या विस्तीर्ण पात्रांतून तृषाक्रांत आपली तहान भागण्यापुरतेंच चार ओंजळी पाणी झोंकून चालता होतो त्याप्रमाणें कमालानें त्या दुकानांतून कणीक, तांदूळ, डाळ, तूप, साखर, हिंग, जिरें इत्यादि जरूर ते पदार्थच हळू हळू बाहेर नेऊन कबीराच्या स्वाधीन केलें. आपलें काम भागलेसें पाहून कमालानें चौर्यकर्म थांबविलें आणि तो बाहेर पडूं लागला. इतक्यांत चोराच्या मनांत विलक्षण विचार उद्भवला ! नादत्या घराला आग लावणें, निश्चिंतपणानें घोरत पडलेल्या वैऱ्याला ठार मारणें, इत्यादि गोष्टीप्रमाणेंच एखाद्या निद्रिताचें घर लुटणें हें कर्म नर्काचें साधन आहे असें समजून त्या कमाल चोरानें त्या वाण्याला जागें करून पळून जाण्याचा बेत केला. निद्रानंदांत निमग्न असलेल्या शेटजीस सावध करून कमालानें त्यास आपलें चौर्यकर्म विदित केलें आणि तो पळून जाऊं लागला. हा कोणी पक्का दरवडेखोर आहे असें जाणून तो वाणी त्याच्या मागें धांवला. राजहंसावर ससाण्यानें झांप टाकावी किंवा पुष्पवाटिकेंत संचार करणाऱ्या कोकिळेला हिंसकानें धरावी त्याप्रमाणें कमाल भिंतीला पाडलेल्या छिद्रामधून बाहेर पडणार तोंच त्या वाण्यानें त्याचे दोन्ही पाय पकडले. कमरेपर्यंतचा भाग छिद्राबाहेर व बाकीचा भाग छिद्राच्या आंत अशी कमालाची स्थिति झाली. वाणी आतून ओढीत आहे व कबीरदास बाहेर ओढीत आहेत त्या योगानें आपली ओढाताण होत आहेसें जाणून कमालानें कबिरास सांगितलें "मी वाण्याच्या हातात सापडलों तर आपलें नांव जाहीर होईल. नगरवासी नारीनरांत आपली छीः थूः होईल. ही चोरीची गोष्ट घरांतील संतजनांना विदित होईल तर जारिणीची मात कानीं पडताच उठून जाणाऱ्या पतिव्रतेप्रमाणें संतजन आपल्या घराचा त्याग करतील. तरी आपण माया ममता टाकून देऊन माझें शिर तेवढें कापून घ्या. हें रामकार्य आहे; ही नीच चोरी नव्हे. हें घोरकर्म प्रपंचाकरितां केलेलें नाहीं. हें कृत्य रामकार्याकरिता आहे. माझा देह रामसंतर्पण झाला तर माझें सार्थक तरी होईल." कमालाचें भाषण ऐकून त्या सत्वगुणसंपन्न कबीरानें कमालाचें शीर कापिलें आणि त्यासह शिधासामग्रीची मोट डोक्यावर घेऊन तो आपल्या घरीं येऊन सुखरूप पोंचला.

या ठिकाणीं कबीराच्या सात्विक औदार्याची सीमा झाली कीं नाहीं ! त्या भक्तिप्राधान्य भक्तराजाला शियाळाची उपमा द्यावी तर ती कमीच वाटतें. आकाशाची विस्तीर्णता, सागराची सखोलता; वाल्मीकीचें कवित्व या गोष्टीप्रमाणेंच तो परमात्मस्वरूप भक्तजन कबीरदास निरुपमच होय. त्याला त्याच्या स्वतःखेरीज अन्य उपमा शोभणार नाहीं.

असो; याप्रमाणें सामग्री घेऊन घरीं येतांच त्यानें ती मीठ व तें शीर आपल्या कांतेच्या स्वाधीन केलें. पुत्राचें मुखकमल पाहतांच त्या माउलीला काय वाटलें असेल बरें ! तिला गहिंवर दाटला. तिचे नेत्र भरून आले; कंठामध्यें हुंदक्यांची गर्दी झाली. मोहाच्या योगानें तिचा प्राण बाहेर पडण्याच्या बेतास आला. पण त्या सात्विकी साध्वीनें आपली सर्व वृत्ति तशीच दाबून टाकून पुत्राचा देह रामकारणीं लागल्यानें वंशोद्धार झाला असा आनंद मानला; आणि ती तशीच स्वयंपाक तयार करण्यास उठली. उत्तम प्रकारचा पाक तयार करून त्या दैविक जोडप्यानें संतजनांना अन्नसंतर्पण केलें. इतका विधी उरकेपर्यंत सूर्योदय झाला. प्रातस्मरण करून सर्व साधूंचा मेळा स्नानविधिप्रत चालता झाला.

कबीरदास कमालाचें शिर घेऊन गेल्यानंतर कमालाचें नुसतें धड त्या वाण्याच्या पूर्णपणें हस्तगत झालें. वाण्यानें घाबरून जाऊन लागलीच बोंब ठोकली. शंखनाद ऐकताच पुष्कळ लोक धावून आले. तस्करांनीं चोराचें शिर कापून नेलें आहे असें पाहून तो चोर ओळखण्याबद्दल सर्वजण पंचायतींत पडले. कोणी कोणी चोरट्यांच्या अकलेची तारीफ करूं लागले. कोणी कोणी वाण्याच्या सुदैवाबद्दल समाधान व्यक्त करून दाखवूं लागले. कोणी लोक द्रव्यजनित भयाचें यथासांग वर्णन करूं लागले. चोरट्यानीं दुकानातील द्रव्यराशीस किंवा वस्त्रपात्रांस स्पर्श न करिता शिधा चोरिला यावरून ते कोणी सज्जन चोर असले पाहिजेत असा तर्क कोणी बसवूं लागले. याप्रमाणें त्रिविध जनाची वाटाघाट संपल्यावर त्या वाण्यानें राजवाड्यात जाऊन आपली फिर्याद दाखल केली.

वाण्याची हकीकत ऐकून राजा क्रोधायमान झाला. त्यानें संतापाच्या भरांत लागलींच त्या मृत प्रेतासच सुळावर चढविण्याची शिक्षा सांगितली. राजाज्ञेप्रमाणें कमालाचें धड घेऊन राजसेवक नगराबाहेर शूळ पुरलेल्या ठिकाणीं प्राप्त झाले.

गंगातीरावर स्नानसंध्या व देवदेवतार्चन सारून संत मंडळी कबीराच्या घरीं परत आली. त्यानीं कबीराचा निरोप घेतला. कबीरकांता लोटांगण घालून संतांचा आशिर्वाद घेऊं लागली. दोघेजण मोठ्या आदरानें त्यांना पोहोंचविण्याला म्हणून त्यांच्या सगतीं गांवाबाहेर आले.

मार्गक्रमण करिता करिता कबीरासमवेत ती संतमंडळी शूळाच्या ठिकाणीं येऊन पोंचली. यावेळीं कमालाचें शिररहित प्रेत सुळावर चढविलें होतें. हा अद्भुत प्रकार पाहण्याकरितां ते सकल साधुजन त्या ठिकाणीं क्षणभर उभे राहिले. तों सांगावयाचें आश्चर्य हें कीं, सुळावरील प्रेतरूपी कमालानें दोन्हीं हात जोडून संतचरणांना वंदन केलें ! हा अद्भुत प्रकार पाहून गंमत पाहण्यास जमलेले बायकापुरुषांना मोठा अचंबा वाटला. त्या विपरीत प्रकाराबद्दल चकित होऊन संतजनांनीं कबिरास प्रश्न केला, "हें प्रेत आम्हांस हात जोडतें यांतील भावार्थ काय ? शिर नसलेल्या कुडींत प्राण राहणें शक्य आहे काय ? वृक्षाच्या मुळ्या तोडल्यानंतर शाखा टवटवीत राहतील

कसा ? तारा तुटून गेल्यानंतरही तंबोऱ्यांतून आवाज निघावा त्याप्रमाणें शिर नसलेल्या कबंधानें आम्हांस नमस्कार करावा ही गोष्ट मोठी विपरीत दिसत ! हा असा महात्मा कोण आहे बरें ?”

संतांच्या आश्चर्यंप्लुत चौकस प्रश्नास कबीरदासानें नम्रतेनें उत्तर केलें, “शरपंजरी पडलेल्या भीष्मदेवाच्या कुडींत जसें प्राणांचें रक्षण झालें; अर्जुनाला आपलें दुःख कळविण्याकरितां रणांत पडलेल्या अभिमन्यूच्या प्राणाचें कुडीमध्ये जसें संगोपन झालें; रामदर्शन घेण्याच्या लालसेनं जटायूच्या शरीरांतील प्राणाचा जसा बचाव झाला त्याचप्रमाणें या मृत देहांत चैतन्य वास्तव्य करीत असावेंसें दिसतें. हा चोर कोणी तरी वैष्णव असून तुमच्या चरणीं प्रणिपात घालण्याच्या प्रबल हेतुस्तवच त्यानें अद्यापि प्राण-धारण केलें आहे. त्याचा हेतु पूर्ण झाला. तुमचें त्याला दर्शन घडलें. आतां नाशवंत देहाचा त्याग करून अक्षयपदीं वास करण्यास तो तस्कर मुक्त झाला.”

कबीराचें हें भाषण ऐकून संतांनीं कबीरास प्रश्न करून त्या चोराची समग्र माहिती विचारली. कबीरदासानें आपला व आपल्या पुत्राचा सर्व मजकूर यथास्थित निवेदन केला. कबीरदासाचें वृत्त ऐकून संत म्हणाले, “आम्हीं होऊन भोजनाची याचना केली नसताना तुम्हीं इतका अट्टाहास कां केला ? कमालासारखा बहुगुण संपन्न वैष्णववीर मारून आम्हांला भोजन देण्याचें काय प्रयोजन होतें ?” संतांच्या प्रश्नावर कबीरदासानें जाब केला, “हा सर्व संसार नाशवंत आहे. जें जें म्हणून आकारास आलें आहे त्याचा शेवटीं लयच होणार आहे. कमालाला मी जरी मारिलें नसतें तरी तो कांहीं अमर होऊन राहिला नसता. ज्याचा नाश निश्चयानें ठरलेला आहे त्याचा कसा तरी लय होऊन रामकार्य साधलें तर त्यांतच पराकाष्ठेचें भूषण आहे असें खरें नव्हे काय ?”

वैष्णववीराचा हा वीरश्रीचा प्रतिप्रश्न ऐकतांच त्या संतांचें हृदय द्रवलें. त्यांनीं लागलीच कमालाचें शिर आणण्याची आज्ञा केली. संतांनीं कमालाचा देह खालीं उतरविला. संतांच्या हातांनीं तें शिर-कमळ धडाला लागतांच बाळ कमाल सजीव होऊन संत चरणांवर लोळूं लागला. वाराणशींतले सर्व जन कबीराच्या चरणधूलींत लोळूं लागले. कबीराला कल्याणकारक आशिर्वाद देऊन संतमांदी निघून गेली. कबीरकमाळ यांची परम, सज्ञान, वैष्णव म्हणून सर्वत्र वाहवा होऊन राहिली.

एकासमयीं कबीरदास विणा घेऊन भजन करीत करीत बाजारांतून चालले होते. तों एका दुकानांत एक वाणीण दळीत असतांना त्यांच्या दृष्टीस पडली. तिचें फिरतें जातें पाहून कबीराचें मन अतिशय द्रवलें. तो तेथेंच उभा राहिला आणि रुदन करूं लागला. येणाऱ्या जाणाऱ्या हजारों लोकांनीं त्याला अश्रुपाताचें कारण विचारिलें. कबीरदास कोणालाच कांहीं उत्तर देईना. कबीर काहींच न बोलतां नुसता रडत आहेसें पाहून लोकांना त्याला वेड लागलें आहेसें वाटलें. त्या बिचाऱ्यांना

कबीराची अंतस्थ व्यथा कशी उमगणार! तो जनांच्या प्रश्नास उत्तर देत नव्हता. यांतील मर्म वेगळें होतें. बेडकाला सापाची मैत्री कशी परवडेल! मद्यपीय मनुष्याला एखादा पंडित नीती कशी विचारील! चंद्रप्रकाशावाचून चकोर कसा तृप्त होईल! पाण्याच्या मोत्यास राजहंस कसे भुलतील! त्याप्रमाणेंच संसारासक्त विषयी जनांना कबीरदास आपल्या अंतर्व्यथेबद्दल काय वार्ता कळवील!

अशाप्रकारें कबीरदास रुदन करीत बराच वेळ उभा असतांना त्या ठिकाणीं निपटनिरंजन प्राप्त झाले. त्यांनीं कबीराला त्याच्या दुःखाबद्दल प्रश्न केला. त्यांना कबीरानें सांगितलें, "जात्यामध्यें पडणाऱ्या धान्यकणाचें जसें पीठ होतें तद्वतच या भवचक्रांत माझें पीठ होणार! या गोष्टीस भिऊन मी शोक आरंभिला." निपटाचा अधिकार जाणूनच कबीरानें त्याला आपलें दुःख कळविलें होतें. नंतर निपट म्हणाले, "कबिरा; व्यर्थ शोक करूं नको. मी तुझी संशयनिवृत्ति करतों. जे धान्यकण आधार सोडून जात्यांत पडले त्यांचें पीठ झालें. जे कण खुंट्याला चिकटून बसले त्यांचें पीठ झालें नाहीं. जे जीव रामचरणी विनटून राहिले त्यांचें काळचक्रांत पीठ झालें नाहीं. तूं चांगला सत्वधीर, वैराग्यशील असून स्वप्नांतील भीतीनें असा कां गांगरतोस!"

निपटाच्या या भाषणानें कबिराचें समाधान झालें. त्या दोघांनीं एकमेकांस आलिंगन दिलें आणि कबीराचें चित्त स्वस्थ होऊन तो घरीं गेला.

नंतर कांहीं दिवसांनीं बरेंच कवित्व केल्यावर कबिराला सद्गुरु करण्याची इच्छा झाली. जगतामध्यें अनेक साधु असल्याबद्दल कबिराची खात्री होती; पण सीतेनें जशी रामचंद्रासच माळ घातली; भीमकीनें श्रीकृष्णासच वरिलें त्याप्रमाणें रामानंदस्वामीसच गुरु करावयाचें असा निर्धार करून कबीरदास रामानंदाच्या आश्रमांत गेला. रामानंदास दुरून नमस्कार करून तो त्यांचा उपदेश मागूं लागला. कबीराचे शब्द कानीं पडताच रामानंद स्वामींनीं कानांत बोटें घातली. ते तेथून उठून गेले आणि एका गुंफेमध्यें जाऊन आसन घालून बसले. कबीरदास त्यांच्यामागें जाऊन गुहेच्या बाहेर उभा राहिला आणि पुन्हा अनुग्रहाची विनंती करूं लागला. कबीर हा अविंधवंशांतला असल्यामुळें त्याला उपदेश देणें रास्त नव्हे असें सांगून रामानंदानीं त्याला मुळींच धुडकावून लाविलें. कबीरानें पुष्कळ दाखले देऊन रामानंदाचा जातिभेदाचा भ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला; पण स्वामी ऐकत नाहींत असें पाहून निराश होऊन तो परत गेला.

रामानंदांनीं कबीरास यवन म्हणून धुडकावलें या कारणानें कबीरानें रामानंदास शिव्या शाप दिले नाहींत. रामानंदाची निंदा आरंभून कबीरानें जातीभेदाचा नायनाट करण्याकरितां व्याख्यानांचा धंदा स्वीकारिला नाहीं. सनातन धर्मावर डोळे वटारून कबीरानें आर्यधर्माचा उच्छेद आरंभिला नाहीं. उलट त्या परमपूज्य सद्गुरु यवनानें रामानंदाच्या चरणाचा स्पर्श व्हावा म्हणून तो अनन्यभावानें स्वामीचे चरण आठवीतच राहिला. रामानंदांच्या चरणस्पर्शानें आपली काया पवित्र व्हावी या हेतूनें


त्यानें स्वामींच्या येण्याजाण्याच्या वाटेवर एक खळगा खणून त्यांत आपला बिछाना घातला. मानसरोवरातील कमळिणी निशाकाळीं मिटून गेल्या असतांना जशी सहस्रकराची प्रतीक्षा करीत बसतात त्याप्रमाणें तो महात्मा कबीर त्या खळग्यामध्यें निजून रामानंदाच्या आगमनाची वाट पहात राहिला. तीन प्रहर रात्र निघून गेल्यानंतर रामानंदस्वामी गंगास्नानाकरितां निघाले. वाटेनें जात असतां स्वामीचा पाय कबीरास लागला. वाटेमध्यें बसलेल्या कोणा मनुष्यास आपली लाथ लागलीसें जाणून स्वामींनीं "कोण आहे" असें विचारून कनवाळूपणानें रामनामाचा उच्चार केला. इतक्यांत कबीरदास उठला आणि म्हणाला, "मी आपला दास कबीर आहे. आपल्या चरणस्पर्शानें आपण मला जन्ममरणातीत केलें हें माझें केवढें भाग्य ! आपल्या मुखांतून निघालेल्या रामनामानें मला महावाक्याचा मंत्रोपदेश झाला. यामुळें मला दुर्बळाला कामधेनूच लाभली आहे असें मला वाटत आहे."

घनवर्षावामुळें टवटवीत दिसणाऱ्या सुकलेल्या झाडाप्रमाणें कबीरदास प्रसन्नहृदय झाला आहेसें ओळखून रामानंदस्वामी तसेच मुग्धतेनें निघून गेले. कबिराचा गुरुभक्तिचा निश्चय पाहून स्वामी आनंदभरित झाले होते तरी त्यांनीं आणखी एकवार आपल्या शिष्याची कसोटी पहाण्याचें ठरविलें.

पुढें कांहीं दिवसांनीं कबीरदास रामनामाचा उच्चार करीत व सद्गुरु रामानंदस्वामींच्या चरणांचा महिमा वर्णीत बाजारांत नाचत असतां रामानंदस्वामी तेथें प्राप्त झाले. त्यांनीं कबीराचें सप्रेम भजन श्रवण करून आपल्या पायांतली खडाव काढून ती कबीराच्या टाळक्यावर जोरानें मारिली आणि त्यास रागानें विचारलें "कबीरा, तूं माझा शिष्य काय म्हणून म्हणवितोस ? आम्हीं तुला उपदेश दिला तरी केव्हां ? आम्ही तुला शिष्य केलें याला कोणी साक्ष आहे काय ?"

वरकरणी क्रोधाचा आव आणून आई ज्याप्रमाणें कन्येला शिकवण देत असते त्याप्रमाणें आपल्याला खरें ज्ञान प्राप्त होण्याकरितां किंवा आपली परीक्षा करण्याकरितांच स्वामींनीं आपल्या मस्तकावर पादुकाचा प्रहार केला असावा अशी भावना धरून डोक्यांतून वाहणारा रक्तप्रवाह न पुसतां कबीरदास बोलले "सद्गुरुमहाराज; आपणाकडून मला उपदेश झाला त्यावेळीं साक्ष कोणी नव्हतें म्हणून माझी निर्भर्त्सना करितां, पण आतां तर आपण माझे गुरु झाला ना ? सर्व लोकांसमक्ष आपण माझ्या डोक्यावर पादुका ठेविल्या या योगानें तरी आपण माझे गुरू ठरला ना ? पंचतत्त्वाना साक्ष ठेवून मी आपल्या पादुका मस्तकावर धारण करितों." कबीराचे हे उद्गार ऐकतांच रामानंद गहिंवरले. त्यांनीं एकदम कबिरास मिठी मारून त्याच्या मस्तकावर आपला अमृतहस्त ठेविला; आणि त्याला 'रामकृष्ण' या मंत्राचा उपदेश करून रामानंद निघून गेले.

सद्गुरुप्राप्तीमुळें कबीर आनंदभरित झाला. गुरुप्रसादानें त्यानें अनेक प्रबंध रचिले. त्याची अतिशय कीर्ति झाली. जो तो कबीरदासाची स्तुति करूं लागला; पण या गोष्टी जातीच्या दुर्जनांना कशा खपणार? सूर्योदय होतांच घुबडें जशीं लज्जित होतात त्याप्रमाणें कबीराच्या सत्कीर्तिरूपी चंद्राचा सर्वत्र प्रकाश पडलेला पाहून दुर्जनरूपी तस्करांना मोठें कष्ट वाटूं लागले. कित्येक निंदक आणि दुर्जन यांनीं कबिराची फजिती करण्याचा विचार ठरविला. त्या दुष्टांनीं हरिद्वार, मथुरा, वृंदावन, द्वारका इत्यादि ठिकाणीं कबिराच्या नांवानें खोटींच पत्रें पाठवून त्या ठिकाणचे हजारों संत कबिराच्या घरीं एकाच दिवशीं भोजनाकरितां प्राप्त होतील असें केलें. कबिराच्या नांवाचीं पत्रें पोंचताच चोहीकडील संतमंडळी ठरलेल्या मितीला कबिराच्या घरांत दत्त म्हणून येऊन उभी राहिली. असंख्य वैष्णवाचा मेळा दारात पाहतांच कबिराला हर्षातिरेक झाला. ज्या दुर्जनांनीं ही कुचाळी केली त्यांना आतां कबीराची फजिती होईल असें वाटून ते टाळ्या पिटूं लागले. पण परमेश्वर नेहमीं सज्जनांची पाठ राखीत असतो हें त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक? कबिरावरील संकट जाणून अयोध्यावासी रामचंद्रांनीं कबिराच्या साहाय्यार्थ धूम ठोकिली. रामचंद्रांनीं कबिराची असंख्य रूपें धारण करून संतांची सेवा आरंभिली. संताचे पाय धुण्यापासून तों त्यांना शय्या पसरून देण्यापर्यंत त्यांची सर्व बरदास्त कबीररूपानें राखण्यात आली. जिकडे तिकडे कबीरच कबीर दिसूं लागलेले पाहताच त्या दुराचारी निंदकांना पश्चात्ताप वाटून ते कबीरास शरण आले. पतंगानें कितीही प्रयत्न केला तरी दीपकाचे तेज नष्ट होत नाहीं; वडवानळानें कितीही श्रम घेतले तरी समुद्र जळत नाहीं त्याप्रमाणें कुटील दुर्जनानीं आपल्या अकलेची शर्त केली तरी सज्जनाचा पाडाव होणें दुरापास्त आहे, याचें प्रत्यंतर पटतांच त्यां खळांनीं कबीराजवळ आपल्या अपराधाची क्षमा मागितली. कबीरदासानें त्यांचे उपकारच मानले. त्यांच्या कपटाचरणामुळेंच आपल्याला साधुसेवेचा लाभ झाला असें समजून त्या महात्म्यानें उलट त्यांचे गुणच गाथिले. असो; त्रिरात्र मुक्काम करून सर्व साधुजन आपापल्या ठिकाणीं निघून गेले. श्रीरामचंद्रानींही स्वस्थानीं गमन केलें. कबीरजी आपल्या कुटुंबासमवेत हरिभजनामध्यें नेहमींप्रमाणें तन्मय होऊन राहिले.



# विनोबांची विचारपोथी

—संत विनोबा

३९. सूर्याजीपासून मी दोर कापून टाकण्याचें तत्त्वज्ञान शिकलों. मला त्याचा अनेक वेळां उपयोग झाला आहे.

४०. संगीत आणि चित्रकला ह्यांचा उपयोग काय ! संगीतानें भगवंताचें नाम गावें, चित्रकलेनें भगवंताचें रूप रेखाटावें.

४१. नामरूप मिथ्या असलें तरी भगवंताचें नामरूप मिथ्या म्हणूं नये.

४२. नीतींत काय येतें ?—नीतींत काय येत नाहीं, हा सवाल आहे. 'निजों तरी जागे' हें अंतिम नीतिसूत्र आहे.

४३. काम संपल्यानंतरचें काम म्हणजे आनंद. 'नीति जयांचिये जीए। लोकेमाजीं ॥'

४४. प्रवृत्ति रजोगुण. अप्रवृत्ति तमोगुण. इकडे आड तिकडे विहीर.

४५. कमळ म्हणजे अलिप्त पवित्रता.

४६. भक्त नम्र असतो. त्याला देवाच्या 'पायाचें' दर्शन पुरेसें वाटतें.

४७. दिवसभर काम करणाराला रात्रींची झोंप जितकी अवश्यक आणि आनंद॰ ारक तितकीच जन्मभर मेहनत करणाराला शेवटची महानिद्रा अवश्यक आणि आनंदक॰ ॱ मृत्यु हें देवाचें सौम्यतम रूप आहे.

४८ ॱ ॱ 'हन्' म्हणजे मारणें आणि 'हन्' म्हणजे गुणणें। हिंसेनें ा गुणाकार होतो.

४९. शेवाळी पासुनि जन्म ओंगळीं आसला चिळसला जीव अंतरीं ।
राहिलों निराळा म्हणुनी तेथुनी सवित्याचें मंगल किरण सेवुनी ।
मी अलिप्ततेचें गाणें गातसें । गा गा रे सखया तूंहि गा तसें ।
येऊनी वामनरूप भृंग तो । येतसे कुटाया मजला धावुनी ॥
परि हृदयाचें बळिदान देउनी । जिंकिला कोंडिला केला गुंग तो ॥
मीं समर्पणाचें गाणें गातसें । गा गा रे सखया तूंहि गा तसें ॥

५१. संध्याकाळची प्रार्थना म्हणजे अंतकाळचें स्मरण आहे.

५२. मी जेव्हां तुकोबासारख्याच्या भावनेकडे पाहतों तेव्हां माझी भावना पुढें काहीं च नाहीं असें मला दिसतें. पण त्याला 'मी' काय करूं !

५३. आत्मदर्शनाशिवाय आनंद नाहीं. आईला मुलाचा चेहरा पाहून आनंद वाटतो. याचें कारण तिला त्या मुलांत आपला आत्मा दिसत असतो.

५४. अत्युत्तम कल्पनांचे विपर्यास अत्यंत हीन असतात. ताज्या फळासारखें आरोग्यकारक अन्न नाहीं, तर कुजलेल्या फळासारखें आरोग्यनाशकहि नाहीं.

५५. स्वार्थं बोलून चालून नागडा आहे. मुख्य पदार्थापासून जपायचें आहे.

५६. गीता अनासक्ति सांगते. पण ईश्वरास आसक्त हो म्हणतेच.

५७. हिरण्यकश्यपूची आज्ञा प्रल्हादानें मानली नाहीं. ह्यांत विशेष नाहीं. व्यासाचा त्याग शुकाला करावा लागला. ह्यांत विशेष आहे.

५८. स्वदेशी हें भूतदयेचें शास्त्र आहे. स्वदेशी म्हणजे ममता नव्हे.

५९. बुद्धि आणि भावना ह्यांचा जेथें मेळ दिसत नाहीं. तेथें इंद्रियनिग्रहाचा अभाव असतो.

६०. परा भक्ति म्हणजे समता; म्हणजे आत्मज्ञान, म्हणजे निर्विकारता.

६१. सगुण निर्गुण एकच आहे. जी वस्तु एका अर्थानें सगुण तीच दुसऱ्या अर्थानें निर्गुण होऊं शकते. तसेंच उलट. उदाहरणार्थ, लोकसेवा सगुण आणि आत्मोद्धार निर्गुण हेंहि खरें आहे आणि याच्या उलटांहि खरें आहे.

६२. सूर्य—ग्रहणात जर दुःखाचें कारण त्यांत पृथ्वी आणि सूर्य ह्यांच्या दरम्यान चंद्र येण्यापेक्षा अधिक काहींच नसते, तर मनुष्यानें पाण्यात बुडत असताना ओरडण्याचेंहि कारण नाहीं, कारण तेथें मनुष्याचें नाक आणि बाहेरची हवा ह्यात पाणी येण्यापेक्षा अधिक काहींच नसतें.

६३. सगुण उपासनेंत नम्रता आहे. निर्गुण उपासनेंत ज्ञानाची जबाबदारी आहे आणि म्हणून 'क्लेश अधिक.'

६४. 'देशे कालेच पात्रेच' हा न्याय स्वतःसहि लागू आहे.

६५. अज्ञानांतून ज्ञान उत्पन्न होऊं शकत नाही.

६६. दुर्बलाचें 'बलिदान' नव्हे. बलिदान बलवंताचें.

६७. 'बलिदान' म्हटलें म्हणजे बळीची आठवण होतें. बलिदान म्हणजे आत्मसमर्पण.

६८. कर्म करीन तर फळहि घेईन हा रजोगुण. फळ टाकीन तर कर्मंहि सोडीन हा तमोगुण. दोन्ही एकच.

६९. 'यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः।' कारण लोकांना सेवक हवा असतो तो भक्त मिळतो. भक्ताला सेव्य हवे असतात ते लोक मिळतात.

७०. रात्रीं कुत्रे भुंकूं लागले त्यामुळें झोप बिघडून भल्या गृहस्थाला 'दुःख' झालें. पण त्या भुंकण्यामुळें आलेले चोर पळून गेले असें दुसऱ्या दिवशीं सकाळीं समजलें, तेव्हा 'सुख' वाटलें.

७१. ब्रह्मचर्य हें पारमार्थिक साधन आहे. ब्रह्मचर्याश्रम ही परमार्थानुकूल सामाजिक संस्था आहे.

७२. युरोपमध्यें विभक्तराष्ट्रपद्धतीचा प्रयोग चालला आहे. हिंदुस्थानांत संयुक्त-राष्ट्र-पद्धतीचा.

७३. अकर्तृत्वाशिवाय अहिंसा-सत्यादि व्रतांचें पूर्ण पालन अशक्य आहे.

७४. ऐश्वर्य हा ईश्वराचा विशेष गुण आहे. भक्तांचें तें अभिलषित नाहीं.

७५. सत्याची व्याख्या नाहीं, कारण व्याख्येचाच आधार सत्यावर आहे.

७६. छातीवर पिस्तुल रोखून धान्य लुबाडणें आणि सोन्याची मोहोर देऊन तें विकत घेणें यांत पुष्कळवेळां मुळींच फरक नसतो.

७७. 'सम-लोष्टाश्मकाञ्चनः' हें खऱ्या अर्थशास्त्राचें मुख्य सूत्र आहे.

७८. धर्म हा संसारांतून मोक्षाकडे नेणारा पूल आहे. त्यामुळें त्याचा एक पाय संसारांत आणि एक पाय मोक्षांत असतो.

७९. सर्व धर्म सत्याचे अंशावतार आहेत.

८०. सूर्यनारायण सत्यनारायणाची प्रतिमा आहे. सूर्योपासना सत्यदर्शनासाठीं आहे.

८१. जगण्याच्या इच्छेंत मरणाचें बीज आहे. ती इच्छा गेली म्हणजे मरण मेलें.

८२. 'अहं ब्रह्मास्मि' मध्ये 'तत्' त्वमसि 'चा निषेध नाहीं.

८३. अहम् । सोऽहम् । नाहम्

८४. आधीं ज्ञान, मग कर्म आणि शेवटीं भक्ति असा माझा अनुभव. याहून निराळाहि अनुभव असूं शकेल. तिन्ही एकरूप आहेत.

८५. व्यक्तांतल्या ज्ञानी सोबत्यापेक्षां अव्यक्तातला श्रद्धालु सोबती श्रेष्ठ. धर्मराजाबरोबर कुत्रा गेला, पण अर्जुन पडला.

८६. सेवा जवळून, आदर दुरून, ज्ञान आंतून.

८७. गंगा कधीं गढूळ असते कधी स्वच्छ असते, पण नेहमी पवित्र असते. आत्मा गंगेसारखा सदा पवित्र आहे. त्याच्या पवित्रतेचा आधार त्याच्या अखंड वाहण्यावर आहे.

८८. राम मर्यादाभूमि, कृष्ण प्रेम समुद्र, हरि जें कांहीं उरतें तें—अनंत आकाश.

८९. कृष्ण जिवंत असतांना उद्धवाला त्याचा वियोग क्षणभर सहन होत नसे. पण कृष्ण मेल्यावर तो त्याचा वियोग पचवूं शकला. अर्जुन कृष्णाच्या जिवंतपणीं त्याचा वियोग सहन करी. पण मेल्यानंतर तो तळमळूं लागला.

९०. ध्यानापेक्षां कर्मफलत्याग श्रेष्ठ म्हटला. कारण, ध्यानांतहि सूक्ष्म स्वार्थ असूं शकतो.

९१ स्थूल विकार म्हणजे पक्का खडक. तो भक्तीच्या झर्‍याला तोंडच फुटूं देत नाहीं. स्थूल विकार जिंकले म्हणजे भक्तीचा उगम होतो. पण भक्तीचा उगम झाला तरी सूक्ष्म विकार उरतातच. कच्च्या खडकातून झरा वाहत राहतो त्यामुळें आवाज होतो तीच 'तळमळ' सूक्ष्म विकारहि नाहींसे झाले म्हणजे तळमळ गेली. ही परा भक्ति.

९२. 'त्याचा मी' ह्या अनुभवात अहंकार नाहीं, पण परोक्षता आहे. 'माझा मी' ह्या अनुभवात परोक्षता नाहीं, तर अहंकार आहे.

९३. 'भूतीं देव' दिसूं लागेल तेव्हां संत सेवेसाठीं कां तळमळतात त्याचें रहस्य समजेल.

९४. ज्ञानदेवांच्या ठिकाणीं गुरुभक्तीचा उत्तम विकास झाला त्यामुळें त्यांना सृष्टी गुरुरूप दिसू लागली. त्यांतून त्यांना दृष्टांत मिळाले. ज्ञानदेवांची मानलेली काव्यस्फूर्ति त्यांच्या गुरुभक्तीचा नैसर्गिक परिणाम होय.

९५. जेव्हा 'इन्द्राय तक्षकाय स्वाहा' हा न्याय वापरला जातो तेव्हां इंद्र तर मरावयाचा नसतोच, पण तक्षक मात्र अमर होऊन बसतो.

९६. आईला मुलाच्या सर्व दोषांसकट मुलगा गोड वाटतो. तसें भक्ताला ब्रह्माच्या सर्व उपाधि सकट—जगासकट—ब्रह्म गोड वाटतें.

९७. स्वधर्म सहज प्राप्त असतो. मुलाला दूध पाजण्याचा धर्म आई मनुस्मृतींतून शिकत नाहीं.

९८. आत्मे सगळेच आहेत. पण आत्मवान् एखादा.

९९. श्रुतिका द्वैताचा इतका कंटाळा कीं आत्म्याचें बहुरूपत्व दाखवितांनाहि तिनें दोनचा पाढा वगळला आहे. "एकधा भवति, त्रिधा भवति, पञ्चधा सप्तधा, नवधा . . "

१००. गाढ झोपेंत विचारांचा विकास झाल्याचा मला पुष्कळवेळां अनुभव येतो. पेरलेलें बी मातीनें झाकलें म्हणजे लोपलेलें भासतें, पण विकसत राहतें. तसेंच हें दिसतें.

१०१. कोशांतील सर्व शब्दांचा 'ईश्वर' हा एकच अर्थ आहे.

१०२. विभूति म्हणजे ईश्वराचे चिह्न मात्र. ते अनुकरणीय असतीलच पुरें नाहीं.

१०३. विरोधी भक्तीचे तीन प्रकार आहेत:—

(१) नैष्ठिक नास्तिकता
(२) नैष्ठिक आसक्तता,
(३) नैष्ठिक नीति—हीनता.

१०४. एक मार्ग—पुण्यानें पापनाश, आसक्तीनें पुण्यनाश.

दुसरा मार्ग—पापानें पुण्यनाश, अनुतापानें पापनाश, भक्त आणि शाक्त.

१०५. कामक्रोधाना आपआपसात लढवून मारणें ह्यांत ज्ञानाचें कौशल्य आहे.

१०६. क्रोध देवावर, क्रोध आपल्यावर, क्रोध क्रोधावर.

१०७. 'अन्तिम' ध्येय वाद म्हणजे पुरुषार्थहीनता. 'अन्तिम' व्यवहारवाद म्हणजे हीन पुरुषार्थ.

१०८. एक कबीरपंथी साधु म्हणाला—"मीं 'ओम्' ओळखत नाहीं, 'सोम्' (सोऽहम्) ओळखत नाहीं नि 'बोम' ओळखत नाहीं."

ठीक आहे. तूं ओम् ओळखत नसलास तरी ओम् तुला ओळखत आहे.

१०९ 'अद्वैत'—भूमिकेवर परपरीक्षणाहि आत्म—परिक्षणच होतें. कारण त्यावेळीं रेड्याच्या पाठीवरचे वळहि आपल्या पाटीवर उमटत असतात.

११०. विचार पुढें धावतो आहे. आचार मागें रेंगाळतो आहे. पण तो विचारांच्या दिशेनें चालला आहे. इतका तरी बचाव आजपर्यंत होता. आतां तोहि उरला नाहीं. कारण, विचार इतका पुढें धावला आहे की त्याची दिशाहि दिसेनाशी झाली आहे. अशा स्थितींत देवाच्या दयेशिवाय बचाव नाहीं.

१११. 'ब्रह्मचर्य आणि अहिंसा ह्यांना गीता शारीर—तप कां म्हणते.?'

कारण, काम—क्रोधाचे वेग निदान शरीराच्या बाहेर पडणार नाहींत इतकी तरी किमान तजवीज गीतेला हवी आहे.

११२. चित्रकाराला स्वतः काढत असलेल्या चित्राचीहि जवळून नीट कल्पना होत नाहीं त्यासाठीं त्याला मुद्दाम दूर जाऊन पहावें लागतें. तटस्थवृत्तीशिवाय सृष्टि-रहस्य उकलणें शक्य नाहीं.

११३. शत्रूवर प्रेम करणें सुरक्षित आहे.

११४. प्राप्त झालेल्या कशाहि परिस्थितीचें भाग्य बनविण्याची कला भक्ताजवळ असते.

'अवघीं भाग्यें येती घरा । देव सोयरा झालिया ॥'

११५. गंगेचें पाणी गडव्यांत घालून तो गडवा सीलबंद करून पूजेसाठीं देव्हाऱ्यांत ठेववात. आत्मा ह्या गंगेच्या गडव्यासारखा आहे. परमात्मा गंगानदी सारखा आहे. दोघांची पापनिवकार शक्ति सारखी. तापनिवारक शक्तींत अंतर आहे.

११६. आत्मदर्शन म्हणजे मोक्षाची चव चाखुन पहाणें, परमात्मदर्शन म्हणजे मोक्षाचें पोटभर जेवण. पहिली गोष्ट 'याच देहीं याच डोळां' अनुभवतां येईल, दुसरा देहपातानंतर.

११७. गोपाळ कृष्णा ! माझा अहंकार कालिया आहे. त्याचें डोकें ठेचशील तेव्हां कालियामर्दनाच्या कथेवर माझा विश्वास बसेल.

११८. संसाराचीं तीन लिंगेः—अहंकार पुल्लिंग, आसक्ति स्त्रीलिंग, असत्य नपूंसक.

११९. बुडत्याशीं सहानुभूति म्हणजे त्याच्याबरोबर बुडणें नव्हे, पण स्वतः तरून त्याला वाचविण्याचा प्रयत्न करणें.

१२०. वृत्ति निर्भय करण्याला प्राणजयाच्या प्रयत्नाचा उपयोग होऊं शकतो.

१२१. अर्जुनाच्या रोमरोमांतून 'कृष्ण कृष्ण' हा एकच ध्वनि निघत होता. म्हणून लोकांनीं त्याचं नांव कृष्ण ठेवलें. गीतेचा श्रोता व वक्ता तोच.

१२२. चार महावाक्यात उत्तरोत्तर चढत्या चार अद्वैत-भूमिका सुचविल्या आहेत :—

प्रज्ञानं ब्रह्म—अद्वैतज्ञान.

अयमात्मा ब्रह्म—ईश्वरसाक्षात्कार.

अहं ब्रह्मास्मि—आत्मानुभव

तत् त्वमसि—विश्वोद्धार







श्रेष्ठ प्रतीची

जी. बी. फाऊंटनपेन

इंक नेहमीं वापरा.

जी. बी. विचारे आणि कं.,

लायब्ररी रोड, दादर-मुंबई २८.

**Statement about ownership and other particulars about Newspaper ( SAI LEELA ) to be published in the First Issue every year after last day of February.**

## FORM IV ( See Rule 8 )

| | | | |
|---|---|---|---|
| 1 ) | Place of Publication | ... | 804–B, Sai Niketan, Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay–14 |
| 2 ) | Periodicity of its Publication | | Monthly |
| 3 ) | Printer's Name | ... | Sharad Krishnaji Sapale |
| | Nationality | ... | Indian |
| | Address | ... | Ramkrishna Printing Press, Rukmini Niwas, Morbag Road, Dadar, Bombay 14. |
| 4 ) | Publisher's Name | ... | Bhalchandra Ganesh Potnis |
| | Nationality | ... | Indian |
| | Address | ... | Sai Niketan, Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay–14 |
| 5 ) | Editor's Name | ... | Bhalchandra Ganesh Potnis |
| | Nationality | ... | Indian |
| | Address | ... | Same as at 4 above |
| 6 ) | Names and Addresses of individuals who own the Newspaper and Partners or Shareholders holding more than one per cent of the total capital. | | Shri Sai Baba Sansthan Shirdi, ( a Charitable and Religious Institution), P. O. Shirdi, District Ahmednagar. |

I. Bhalchandra Ganesh Potnis., here by declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

( 5 ) B. G. Potnis
Signature of Publisher.

28th February 1966

# लालबहादुर शास्त्री यांचें

# संस्मरणीय कार्य

पंतप्रधान श्री. लालबहादुर शास्त्री अठरा महिन्यांपूर्वी सत्तारूढ झाले तेव्हां त्यांना अनेक समस्या हातावेगळ्या करावयाच्या होत्या. मुख्य म्हणजे सत्तारूढ पक्ष जनतेच्या भावनांबाबत संवेदनक्षम आहे अशी जनतेची खात्री पटावयाची होती. कारण जनताजनार्दनाच्या लोकशाहीनिष्ठेला तडा गेला कीं साराच कारभार आटोपला अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच विशिष्ट कल्पना मनाशीं बाळगून शास्त्रीजी मैदानात उतरले. नव्या उमेदीनें आणि निश्चयानें! नेहरूंसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नेत्यानें भूषविलेली जागा आपल्याला पेलेल कीं नाहीं, या चिंतेनें ते कांहींसे हादरून गेले होते. त्यामुळेंच कीं काय, पहिल्या सहा महिन्यांत ते कांहींसे चांचपडतच वाटचाल करीत होते. नंतर मात्र त्यांच्यातल्या आत्मविश्वासाला आगळें तेज चढलें.

एका भल्या पहाटे सर्वसामान्य जनतेला उत्साहजनक वाटेल असें वृत्त वृत्तपत्रांत वाचावयास मिळालें आणि लालबहादुरांच्या कर्तृत्वाची साक्ष पटली. कोणत्याहि प्रकारचा गाजावाजा न करतां देशांत अनेक ठिकाणीं छापे घालून काळा पैसा ताब्यात घेण्यांत आला होता. यांत मंत्र्यांच्याभोंवतीं पिंगा घालणाऱ्या सिने-नटनट्या होत्या, त्याचप्रमाणें नामवंत उद्योगपतीहि होते. 'काळा पैसा' हुडकून काढण्याच्या घोषणाच ऐकणाऱ्या सर्वसामान्य जनतेंत या घटनेमुळें नवचैतन्य निर्माण झालें नसतें तरच नवल !

नव्या राजवटीनें प्रारंभ तर चांगलाच केला. पण खुद्द सत्तारूढ पक्षांतील अपप्रवृत्तीच वाढीला लागल्या होत्या त्याचें काय! खुद्द स्वकीयाविरुद्ध शस्त्र हातीं धरण्याचा बांका प्रसंग त्यांच्यावर ओढवला. पण न्यायनिष्ठुर लालबहादुरांच्या ठायीं आपपर भाव नव्हता. दुसरें म्हणजे Charity begins at home हा मंत्र त्यांनीं प्रत्यक्षांत उतरविण्याचें ठरविलें. कैरॉं-विजू पटनाईक-बिरेन् मित्रा आदींनीं सत्तेच्या गाभाऱ्यांत शिरून आपलीं घरें भरलीं, लांचलुचपत व भ्रष्टाचार यांनीं सारी राज्य-यंत्रणा पोखरून काढली आदी आरोप या तिघांवर होते. त्यांच्याविरुद्ध विरोधी पक्षीयांनी बरीच ओरड केली होती आणि प्रजासमाजवादी पक्षाच्या खासदारांनीं तर

( द्विवेदी–नाथ पै–ह. वि. कामथ ) पुराव्याचे डोंगर उभे केले होते. रीतसर चौकशी झाली आणि पंतप्रधान शास्त्रींनीं क्षणाचाहि विलंब न लावतां या तिघांनाहि सत्ता-स्थानावरून दूर केलें.

तीच गोष्ट भारताचे अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांची ! आपल्या स्थानाचा त्यांनीं दुरुपयोग करून पैसा केला हा त्यांच्यावरचा मुख्य आरोप; संसदेच्या कांहीं सदस्यांनीं यासंबंधीचें निवेदन पंतप्रधानांना सादर केलें. आपल्याच मंत्रिमंडळां-तील एका महत्वाचें स्थान भूषविणाऱ्या सहकाऱ्यावर करण्यांत आलेल्या या आरोपा-मुळें शास्त्रीजींच्या हळुवार मनाला धक्का बसला. जणूं त्यांच्याच धवल चारित्र्यावर शिंतोडे उडाले होते. आणि या काहींशा बेचैन मनःस्थितीतच त्यांनीं हें सारें प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशाकडे सुपूर्द करून त्यांचें मत घ्यावें असा पर्याय टी. टी. के. समोर मांडला. पण श्री. कृष्णम्माचारी यांना हें प्रकरण चव्हाट्यावर जायला नको होते. चौकशी व्हायचीच झाल्यास मंत्रिमंडळांतील सहकाऱ्यांमार्फत व्हावी अशी त्यांची मागणी होती. यावर न्यायनिष्ठुर शास्त्रीजी म्हणाले, “ राज्यकर्त्यांचें चारित्र्य सीतेप्रमाणें पवित्र व सोज्ज्वळ हव. तें तसं आहे याची खात्री जनतेला पटायला हवी. मग त्यासाठीं लागेल तें दिव्य करायला सिद्ध झालें पाहिजे. कृष्णमा-चारीजी, तुमची बाजू खरी असेल तर या अग्निदिव्यांतून जायलाच हवं. तुम्हीं अधिक नेकीचे ठराल. तावूनसुलाखून निघालेल्या तुमच्या चारित्र्यामुळें मंत्रिमंडळाचीहि प्रतिष्ठा वाढेल.”

पण शास्त्रींची ही भावना ओळखणें टी. टी. कृष्णम्माचारींना गैरसोयीचें वाटलें असावें. म्हणूनच पंतप्रधान शास्त्री यांनी ताश्कंदला प्रयाण करण्यापूर्वी अवघे दोन दिवस आधीं त्यांनी आपला राजीनामा सादर केला. पंतप्रधानांनीं तो तत्काळ स्वीकारला. निष्कलंक चारित्र्याचे सहकारी असतील तरच राष्ट्राचा गाडा सुरळीतपणें चालेल ही त्यांची श्रद्धा होती. आणि या श्रद्धेपायीं त्यांनीं व्यक्तिगत ऋणानुबंधाचें बंधनहि झुगारून दिलें.

अशा या सत्वशील माणसानें अतिबिकट परिस्थितीवर मात करण्यासाठीं काळाशीं शर्यंत चालविली होती. त्यांची राष्ट्रनिष्ठा म्हणजे बावनकशी सोनें होतें. आंतरराष्ट्रीय राजकारणांत आपला दबदबा निर्माण व्हावा या गंडानें त्यांना कधींहि पछाडलें नाहीं. त्यामुळेंच त्यांचें सारें लक्ष देशांतर्गत प्रश्नावरच केन्द्रित झालें होतें. आशिया खंडातील सर्व नवमुक्त राष्ट्रांत हुकुमशाही राजवटी स्थिर झाल्या असतांना, भारतीय लोकशाहीची जोपासना करणें किती अवघड होतें. आणि म्हणूनच या

लोकशाहीवरील श्रद्धेला तडा जाऊं नये म्हणुन पंतप्रधान श्री. शास्त्री कणाकणानें झिजत होते. त्यासाठीं त्यांनीं स्वकीयांचीहि गय केली नाहीं. कोणताहि निर्णय घेईपर्यंतच ते काहींसें चाचपडल्यागत वागत. पण एकदा निर्णय घेतल्यानंतर मात्र त्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठीं सर्वस्व वेंचायला सिद्ध होत. शेख अब्दुल्लाच्या राष्ट्रद्रोही कारवायांना आळा घालण्यासाठीं त्याना स्थानबद्ध करण्याचा धोका पत्करण्यास मंत्रिमंडळात काचकूच चालली होती. पण शास्त्रीजींच्या हिशेबी राष्ट्रद्रोहाला क्षमा नव्हती. त्यांनीं मोठ्या धैर्यानें शेख अब्दुल्लांची रवानगी तुरुंगांत केली. हिंदी भाषेच्या प्रश्नावरून दक्षिण भारतांत उद्‌भवलेल्या दंगलींचा आगडोंब त्यांनीं मोठ्या कौशल्यानें विझवला. अशा एक नि अनेक आपत्तींशीं शौर्यानें झुंज देत असतांनाच काश्मीरांत रणकुंड पेटलें आणि याच रणकुंडामुळें त्यांचें व्यक्तिमत्व उजळून आले.

राष्ट्राच्या सार्वभौमत्वावर घाला घालण्यासाठीं पाकिस्तानी राज्यकर्त्यांनीं अघोषित युद्ध पुकारल्याच्या वार्तांनीं ते बेचैन झाले; पण क्षणभरच ! मग मात्र हा नरसिंह खवळून उठला. सर्वस्व पणाला लावून राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याच्या जिद्दीनें ते पुढें सरसावले. राष्ट्राचा पुरुषार्थ जागा करण्याचा मान या वामन–मूर्तीनें पटकावला. अमेरिकन शस्त्रास्त्रांनिशीं लढणाऱ्या पाकिस्तानी भुरट्यांना पाणी पाजण्यासाठीं भारतीय जवानानीं पराक्रमाची शर्थ केली आणि पंतप्रधानाचे डोळे आनंदाश्रूनीं भरून आले. भारतीय जवान लाहोरच्या वेशीवर जाऊन थडकले आणि त्यांनीं नेफा-लडाखमधील पराभवामुळें पदरीं आलेलें लांछन दूर केलें. जवानांच्या त्या शूर–कथा जाहीर सभांतून सांगताना पंतप्रधान श्री. शास्त्री शब्दशः भारावून जात. ते म्हणायचे, " नेफा–लडाखच्या वेळचा भारत आतां इतिहासजमा झाला. "

असा हा संघर्ष चालू असतांनाच विस्तारवादी चीननें वांकुल्या दाखवण्यास प्रारंभ केला. नसत्या कुरापती काढण्यास सुरुवात केली. पण शास्त्रीजी डगमगले नाहीत. चीनशीहि तशीच वेळ आल्यास चार हात करण्याचा निर्धार त्यांनीं घोषित केला आणि शास्त्री म्हणजे नेहरू नव्हेत याची जाणीव झाल्यामुळें चिन्यांनीं माघार–घेण्याचा अवलंब केला.

अशा प्रकारें पंतप्रधान श्री. लालबहादुर शास्त्री यांनीं भारताला पुनश्च मानाचें स्थान प्राप्त करून दिलें.

स्वातंत्र्यानंतरच्या १७ वर्षांच्या काळांत नेहरूंनीं अनेक लहानमोठ्या समस्यांचे गुंतवळे तयार करून ठेवले होते आणि हे सारे गुंतवळे सोडविण्याची जबाबदारी

शास्त्रीसारख्या छोट्या माणसाच्या खांद्यावर येऊन पडली. शास्त्री शरीरानें दुबळे होते, पण मनानें तगडे होते. वज्र-निर्धाराची कवच-कुंडलें त्यांच्यापाशीं होतीं आणि याच कवच-कुंडलांनिशी ते लढले आणि विजयी झाले. प्रत्यक्ष संघर्ष कालात भारताची आर्थिक नाकेबंदी करण्याचा घाट पाश्चात्य राष्ट्रांनीं घातला; पण ते डरले नाहीत. संतापानें बेभानहि झाले नाहींत. लाचारी पत्करली नाहीं, त्याचप्रमाणें विजयोन्मादानें कत्तप्रहार करण्यासहि पुढें सरसावले नाहींत. म्हणूनच, सोव्हिएट रशियाच्या पंतप्रधानांनीं ताश्कंदला भारत-पाकिस्तान शिखर परिषद भरविण्याचा संकल्प जाहीर करताच त्याला त्यांनीं तात्काळ साद दिली. असें करतांना अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन रागावतील, ब्रिटनचे पंतप्रधान विल्सन जळफळतील आणि चिनी सत्ताधारी बोटें मोडतील याबद्दल त्यांची शंभर टक्के खात्री होती, परंतु त्यांची त्यांनीं तमा बाळगली नाहीं. पाकिस्तानचे राज्यकर्ते पराभवाच्या तडाख्यानें शहाणे झाले असल्यास शांतता प्रस्थापनेसाठीं बोलणीं करण्यास प्रत्यवाय नाहीं ही त्यांची धारणा! आणि याच एकमेव भावनेतून ताश्कंद परिषदेला भारतानें प्रतिसाद दिला.




# वेलजी रणशी आणि कंपनी

१६४ हिल रोड, बांद्रा

## डालडाचे घाऊक व्यापारी

तसेंच आमचेकडे सर्व तऱ्हेचा किराणा माल मिळतो.

टे. नं. ५२२२७७

# श्री दासगणूमहाराज यांचें काव्यवाङ्मय

श्री संत दासगणूमहाराज यांचें वाङ्मय अत्यंत रसाळ तसेंच भक्तिरसानें ओतप्रोत भरलेलें आहे. श्री. अनंतराव आठवले यांनीं त्यांच्या वाङ्मयाचा अत्यंत बारकाईनें अभ्यास करून 'व्यक्ति आणि वाङ्मय' या चरित्रात्मक ग्रंथात त्यासंबंधीं सुंदर व रसाळ विवेचन केलें आहे. त्यांच्या काव्यामृताचें वाचकांस पान करवितांना ते म्हणतात—

देवतेला प्रसन्न करण्यासाठीं गोंधळ घालण्याची एक प्रथा आहे, पण त्या गोंधळाचें स्वरूप लौकिक संबळतुणतुण्याचें असूं नये, तर भावात्मक असावें हें सांगण्यासाठीं महाराजांनीं जें अध्यात्मिक गोंधळाचें रेखाचित्र रेखाटलें आहे, तें वेंचा क्रमांक ३५ मध्यें पहा. महाराज शेवटीं म्हणतात—

> " असे गोंधळी झाल्या येईल पुंडलिक वरदायिनीं ।
> रंगा तुमच्या दासगणु म्हणे लाव बया मज स्तनीं ग ॥ "

ज्या देवतेचें आराधन महाराजांनीं आतांपर्यंत केलें, त्याविषयींची त्यांची कल्पना किती भव्योदात्त स्वरूपाची आहे, तें नामदेवाख्यानांतील पुढील श्लोकांत उत्तम रीतीनें वर्णिलें गेलें आहे.

> " सिद्ध–ज्ञान भिमातटानिकटहि ब्रह्मांड रे पंढरी ।
> जीवांचा समुदाय हाच महिच्या वीटे उभा श्रीहरी ॥
> येथींचा मुनि पुंडलीक समजे सद्भाव रे राजसा ।
> तेथींचा झणिं होय वारकरि तूं सेवीं सुभक्तीरसा ॥ "

ईशभक्ति ही संकुचित नसून मानवाच्या परमोच्च कल्याणासाठीं ती किती व्यापक भूमिकेवर सुप्रतिष्ठित झालेली आहे, हें या रूपकांतून महाराजांनीं स्पष्ट केलें आहे. हें केवळ रूपक नाहीं; महाराजांच्या दृढविचारानें निश्चित झालेल्या तत्त्वज्ञानाचा तो स्वाभाविक असा आविष्कार आहे.

त्यामुळें त्यांच्या तत्वज्ञानाचें स्वरूप काय आहे, तें स्पष्टपणें लक्षात येईल सिद्धांताच्या दृष्टीनें श्रीमत् शंकराचार्यांचें अद्वैत तत्वज्ञान त्यांना संपूर्णपणें मान्य असू त्याचाच पुरस्कार त्यांनीं आपल्या सर्व ग्रंथभर केला आहे.

" तूं सर्व घटीं ओतप्रोत " हा अध्यात्माचा सिद्धांत किंवा 'जीव तोच शि साक्षात्' अशा तऱ्हेचे उल्लेख त्यांच्या सर्व ग्रंथभर ठिकठिकाणीं आढळतात. अव्यक्त अक्षय, सच्चिदानंद, अशा परमात्म्याच्या इच्छेमुळें सर्व ब्रह्मांड साकार झालें, ही साक होण्याची इच्छा, हेंच मुळीं मायेचें स्वरूप. ईश्वराची जी शक्ति तीच प्रकृति, तिला

माया असें म्हणतात, पण हा फक्त शाब्दिक व्यवहार झाला. अग्नि आणि अग्नित्व हे जसें मुळांत मुळींच भिन्न नाहींत, तेच पुरुष आणि प्रकृतीचें स्वरूप आहे. माया ही असत्य मुळींच नाहीं, पण तिला सत्यहि म्हणतां यायचें नाहीं. 'सदसद्‌विलक्षण' असा तिचा मिथ्याभाव असल्यामुळें तिचे शब्दानें वर्णन करणें शक्य नाहीं. सोन्याचे अलंकार झाले, तरी त्या अलंकारामुळें जसा सोनेपणाचा लोप होत नाहीं, त्याचप्रमाणें मायेमुळें विस्तारलेल्या या विश्वाकारांत सच्चिदानंद असा पुरुष लोपला जात नाही. कारण सोन्याचे दागिने पण जसें सोन्यांतच समाविष्ट आहेत त्याप्रमाणें प्रकृतिहि पुरुषांतच सामावलेली आहे; तिला वेगळे असें अधिष्ठान नाहीं. सुंदर पुरुषानें स्त्रीवेष घ्यावा, आणि त्या स्त्रीवेषाच्या सौंदर्याला मूळचें सुंदरपणच अधिष्ठान असावें, तसेंच जगत् आणि जनार्दन याचे आहे. त्यामुळेंच सगुणाची उपेक्षा करूं नये. ब्रह्मज्ञान झालें तरी सगुण भक्ति करावी, कारण ब्रह्मज्ञान झालें या जाणिवेपोटींच अहंकार मूळ धरून असण्याची शक्यता असते आणि त्याचा निरास भक्तिविना होत नाहीं याच स्वरूपाचें त्यांचें मत आचार्यपरंपरेशीं आणि संतांनीं प्रतिपादिलेल्या भागवतधर्माशीं पूर्णपणें सुसंगत आहे. त्यात त्यांचे स्वतःचें असें कांहींच नाहीं. कोणत्याहि संतवाङ्मयांत याच तऱ्हेचें प्रतिपादन आढळेल. महाराजांचें वैशिष्टय आहे, तें निरनिराळीं मतें आणि साधनें यांच्याशीं आपलें न सोडतां द्वेषरहित समन्वय राखण्यांत ! त्यामुळें कर्म, उपासना, भक्ति, ज्ञान, योग या सर्वांचेंच आपापल्या परीनें त्यांनीं मथातून विवेचन केलेलें आढळतें. साधनमार्गांतील पायऱ्या म्हणून अधिकारपरत्वें त्या सर्वांचा त्यांनीं साधनमार्गांत प्रवेश केला आहे. बाल्य, तारुण्य, वार्धक्य या स्थितीप्रमाणें कर्म, उपासना, ज्ञान यांचा स्वीकार मुमुक्षूनें केलाच पाहिजे. एकाशिवाय दुसऱ्याची, दुसऱ्याशिवाय तिसऱ्याची उत्पत्तिच होऊं शकत नाहीं. म्हणून या सर्वांचा स्वीकार साधकानें करणें आवश्यक आहे. मात्र तो करीत असतांना स्वतःशीं संपूर्णपणें प्रामाणिक असलें पाहिजे, त्यात दंभाचा लेशहि येऊ नये. अन्यथा सर्व साधन व्यर्थ जातें. तसेंच इतरांच्या साधनांचा व त्यांच्या उपासनापद्धतीचा लवमात्र द्वेषहि करूं नये; कारण शेवटीं एकच आहे.

आपल्या आराध्य दैवताचें वर्णन करीत असतांना एका संस्कृत श्लोकाचा मागोवा घेत महाराजांनीं रचलेला श्लोक त्यांच्या मनाचा निदर्शक आहे.

> "शैवा जो शिव, वैष्णवा हरि गमे, वेदांतिया ब्रह्म जो ।
> बौद्धा बुद्धहि जो, खुदाहि यवनां, अर्हन्त जैनांस जो ॥
> कर्ता जो हि गमे प्रमाजपटुना, जें कर्म मीमांसका ।
> ख्रिस्त्यां येशुहि, तोच हा गणू म्हणे घ्या रुक्मिणीनायका ॥"

याच तऱ्हेचें वर्णन त्यांनीं 'व्यंकटेशस्तोत्रांतहि' केलेलें आहे. या तऱ्हेच्या भावनेमुळें ज्याला आपण पंथनिष्ठेचा दुराग्रह म्हणतों, तो महाराजांच्या जीवनांत कधींच दिसून येत नाहीं. आपलें तत्त्वज्ञान ते खरोखरीच जागत आहेत. कळतें, पण वळत नाहीं, अशी त्याची स्थिति नाहीं. त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें वेंच्यामधील

'प्रकृतिपुरुष' 'अद्वैत व भक्ति' सत्य व मिथ्या' 'सगुणनिर्गुण' कर्मभक्तिज्ञान' हे वेंचे अवश्य अभ्यासले पाहिजेत.

या तत्त्वज्ञानातून त्यांनीं सांगितलेला सदाचाराचा उपदेश जन्म घेतो. त्यांत व्यवहारीपणाच्या दृष्टीनें अगदीं बारीकसारीक गोष्टीविषयीचे आचारनियम वास्तव दृष्टिकोणातून त्यानीं बांधून दिले आहेत. सुखी जीवन जगण्याच्या दृष्टीनें प्रत्येक संसारी माणसानें त्याचा अवलंब करावा, असा सखोल मार्मिकपणा या उपदेशांना प्राप्त झाला आहे वेंच्यामधील 'सदाचार' आणि 'शिष्योपदेश' हीं दोन प्रकरणें त्या दृष्टीनें पाहिलीं पाहिजेत. चातुर्वर्ण्यासंबंधीं त्याचा दृष्टिकोणहि उदार पण सनातनपरंपरेला धरून असा आहे. वर्णच असूं नयेत, त्याच्या कर्मांचा संकर व्हावा, विवाहबंधनें तुटावींत व सारा एकंकार व्हावा, हें मत महाराजांना तिरस्करणीय वाटतें. त्याना वर्णसंकर मुळींच नको आहे, पण जातिमत्सर हा मात्र ते एक भयंकर रोग समजतात. हिंदुधर्म ही चार पायाची एक सुलक्षण कपिलाधेनु आहे; किंवा हिंदु धर्म हा एक मोठा वृक्ष असून अनेक जाति या त्याच्या फांद्या आहेत, त्यामुळें वृक्षास शोभा आली आहे. त्या तोडून वृक्षाचा सरळ असा सौंदर्यहीन सोट बनवूं नये, परंतु या फांद्यांना आपण एकाच वृक्षाच्या शाखा आहोंत, हें मात्र लक्षात ठेवण्यास ते सांगतात. फुटीरपणा त्याना मुळींच पसंत नाहीं. एका स्फुटात ते म्हणतात—

"जातिजातिचें समाज निघाले 'ऐक्यवर्धन नांव तया ॥
झाड पडलें धरणीवरतीं फांद्या लागल्या नाचाया ॥"

चारी वर्णांच्या ठिकाणीं कांहीं गुण, कांहीं दोष आहेत. कुणीच स्वयंपूर्ण नाहीं. एकमेकाला पूरक होण्याच्या दृष्टीनेंच ही ईश्वरी योजना झालेली आहे, असें महाराजाचें मत आहे. त्यामुळें प्रत्येक व्यक्तीनें आपापल्या क्षेत्रात आपापल्या परीनें कर्तव्यदक्ष राहून निःस्वार्थपणें कार्य करावें आणि त्याचा लाभ सगळयाना घेऊं द्यावा. वेंच्यामधील 'चातुर्वर्ण्य' हा उतारा यासाठीं अवश्य पाहिला पाहिजे.

स्वसंस्कृतीचा अभिमान महाराजाच्या ठिकाणीं पुरेपूर भरलेला आहे. आपलें सोडणें, त्याना भेकडपणाचें वाटतें. आचारामध्यें परक्याचें अनुकरण करणें, यासारखी दुसरी वाईट गोष्ट नाहीं, हें आग्रहपूर्वक आणि नवीन रीतिरिवाजाचा उपहास करीत त्यानीं आपल्या काव्यातून अनेक ठिकाणीं प्रतिपादलें आहे. वेंच्यामधील रंगपंचमीच्या पोवाड्यांतील उत्तरार्ध, व स्फुट पदांतील कांहीं फटके, या दृष्टिकोनातून वाचून विचार करण्यासारखे आहेत. इंग्रजाचे घ्यायचे ते गुण कांहीं आपण घेतले नाहींत, असा महाराजांचा दावा आहे. गायत्रीस्तोत्रामध्यें त्यांनीं आपलें हें मत अगदीं स्पष्टपणें मांडलेलें आहे. पाश्चात्याचा एकोपा, त्यांचें देशप्रेम, त्यांची संशोधकबुद्धि, त्यांचें धाडस, त्यांची आपल्या रिवाजाला न टाकण्याची निष्ठा, यापैकीं कांहींहि न करिता आपण त्यांच्या कोटपाटलोण, स्त्रीपुरुषस्वैरता, मनसोक्त विधिनिषेधरहित आहार अशाच गोष्टी स्वीकारल्या आणि त्यामुळेंच आपल्या देशाची, धर्मांची, समाजाची सर्वांगीण अवनति झाली

आहे. त्यामुळें समाजामध्यें सर्वत्र दुःखदैन्य यांचा अनिर्बंध संचार होतो आहे. 'सद्यःस्थितीवरील कवनात' याचें विस्तारानें वर्णन आलें आहे. या ठिकाणीं वर्णिलेली समाजाची दुरवस्था कोणासच नाकारतां येणार नाहीं. त्यावरील उपाययोजना आणि तिची कारणमीमांसा यासंबंधीं आधुनिक जगतातील लोकांचा श्रीदासगणूमहाराजांशीं मतभेद होण्याची पुर्ण शक्यता आहे. पण श्रीदासगणूमहाराजांची भूमिका पूर्णपणें लक्षांत घेतली, म्हणजे मग हा मतभेद मूळ तत्त्वाचा न उरतां, कांहीं थोड्या तपशीलाच्या दृष्टीनेंच अस्तित्वात राहील, यात मला शंका नाहीं. ऐहिक सुखास लालचावून त्याच्या मागें स्वैरपणें धावण्यांत समाजाला अनेक तऱ्हेच्या आपत्ति भोगाव्या लागतात, ही गोष्ट आजच्या, ऐहिक सुखवादाचा प्रसार धूमधडाक्यानें चालू असलेल्या काळांत सहजपणें न पटली तरीहि ती वस्तुतः पूर्ण सत्य आहे. त्यामुळें ऐहिक सुखाचा अतिरिक्त लोभ कमी करणारी हरिभक्ति हाच त्यावरील उपाय आहे, कारण त्यागेनैकेन अमृतत्वमानशुः' हा उपनिषद्सिद्धात त्रिकालबाधित सत्य असून हरिभक्तीव्यतिरिक्त या त्यागाचें महत्त्व आचरणात येणारें नाहीं. या अशा सामाजिक भूमिकेवरूनच महाराज हरिभक्तीचा पुरस्कार करीत असल्यामुळें त्यांच्या प्रतिपादनास इतर कोणाहि भक्तिमार्गीयापेक्षा अभिनवता आलेली आहे.

ह. भ. पं. श्री. धुंडा महाराज म्हणतात, "श्रीदासगणु महाराजांनीं केलेली भक्तिसंबधीची व्याख्या फार व्यापक आहे. भक्ति तीच खरी, आणि तेंच म्हणावें भजन ( वेचा ४०, ४१ ) हीं दोन पदें त्या दृष्टीनें अभ्यासली पाहिजेत. दुसऱ्या एका पदात ते म्हणतात—

विश्वास मुळे या भक्ति तरूची खरी ।
सन्नीति हेच तूं खोड समज अंतरी ।
प्रेमाची शोभे साल सुवक त्यावरी ।
उपासना त्या वरती फाद्या नानाविध रजना ॥
पाने मनिचा कोमलपणा ॥
अशा भक्तिच्या तरूस साक्षात्कार मोहर येतसे
जगा जो थक सदा करितसे
सहजासहजीं ज्ञानफळाचा उद्भव मग होतसे
कधी ना श्रम पडती फारसे

या पदातील वृक्षाचें रूपक नुसतेंच मनोहर नाहीं तर महाराजांच्या भक्तिविषयक तत्त्वज्ञानाचे तें द्योतकहि आहे. श्रीदासगणू महाराज पूर्णपणें सुगुणोपासक आहेत मात्र त्याचे उपास्य जो पांडुरंग त्याला ते कैवल्यकंद म्हणतात हें विसरतां येणार नाहीं. त्याची उपासना प्रतिकनिष्ठ नाहीं. शुद्ध तात्त्विक आहे. या सगुणोपासनेच्या विरुद्ध असणाऱ्यांचा त्यांनीं योग्य शब्दांत समाचार घेऊन शेवटीं स्वमत प्रतिपादन केलें आहे.

भक्तिमार्ग हा श्रद्धाप्रधान आहे. संशयात्मा विनश्यति हें या मागात संपूर्ण अर्थानें खरें आहे. त्यामुळें चिकित्साच करूं नये असें म्हणावयाचें नसलें तरी फाजिल चिकित्सा कामाची नाहीं ती घातक ठरण्याचा फार संभव असल्यानें.

"वृक्षाचे पाहिल्या मूळ । दिसेल दगडमाती आणि गाळ ।
त्यातचि गोंविल्या मन, फळ । न येईल हाताशी ॥
म्हणुन चिखल चिवडूं नको । फल घेण्या विसरूं नको ।
इतिहासासी देऊं नको । महत्त्व कदा भक्तिमधे ॥
इतिहासासी महत्त्व देता । खरी भक्ति नये हाता ।
या साठीं पुण्यवंता । सार शोधणे सर्वकाळ ॥"

भ. सा. २१

श्रीदासगणू महाराजांनीं शुष्क चिकित्सेचा जसा वर निषेध केला आहे, तसाच ज्ञानरहित अंधश्रद्धेचा व दांभिकतेचाहि पूर्ण निषेध त्यांच्या वाङ्मयांतून पदोपदीं आढळून येतो.

श्रद्धा ठेवणे धर्मावरी । परि अंधश्रद्धा नाहीं बरि । अंधश्रद्धेनें होळी खरि । होईल तत्त्वासह सुखाची ॥

भ. सा. अ. २३–२८१.

तसेंच दांभिकतेचीहि त्यांनी पदोपदी निंदा केली आहे. भक्ति-मार्गांत दांभिकांचा भरणा झाल्यास त्या श्रेष्ठ मार्गाची किंमत कशी कमी होते हें त्यांनीं अनेक ठिकाणीं विस्तृतपणें कडक भाषेंत सागितलें आहे. सांप्रदायिकांमध्यें दांभिकपणा शिरल्यानें सांप्रदायाचें स्वरूप कसें विकृत बनलें हें अनेक ठिकाणीं त्यांनीं सिद्ध केलें आहे. श्री. शं. चरित्रांत ते म्हणतात—

मतप्राबल्य माजले । आंतील तत्त्व पळाले । दंभाचारा महत्त्व आले । खरें कोणीच पाहिना ॥ ३४ ॥ भस्मकोळसा द्वारावति । कुंकुम सेंदुर हळद ती । ऐशा विशेष चिन्हाप्रति । महत्त्व आलें पथाच्या ॥ ३५ ॥ मग काय विचारता । एकमेकांच्या करण्या घाता । टपुनि बसले सर्वथा । वृथाभिमानी पुढारी ॥ ३६ ॥

खालील पद पहा—

ढोंग धतूरा माजऊनिया जन नादी लाविती । अशाला भेटेल काय श्रीपति ॥धृ॥ भाळि टिळे ढळढळित चंदनी लावुनि चतुराइचे । जणूं का सिग्नल आगगाडीचे ॥१॥ उपकरण्याला वधुनि भाळता जरि भगवान कीरिटी । तरी का तांबट थोडे हटी ॥ २ ॥ चांदीसोने पाच हिऱ्याला जरि भगवान भाळता । तरी का सराफ हटी बैसता ॥ ३ ॥

# ज्ञानेश्वरीचें महात्म्य

—गुरुदेव रानडे

## ज्ञानेश्वरी-रचनेचा काळ व स्थळ

श्रीज्ञानेश्वरांनीं स्वतः आपल्या ज्ञानेश्वरीच्या शेवटीं त्या ग्रंथाचा काळ व स्थळ याचा निर्देश केला आहे. "गोदावरीच्या दक्षिण तीरीं, महाराष्ट्र प्रांतात, त्रिभुवनांत अत्यंत पवित्र व जगाचें जीवनसूत्र असलेलें. 'महालया' किंवा 'मोहिनीराज' नावाचें देऊळ आहे. तेथें यादववंशविलास श्रीरामचंद्र राजा राज्य करतो. तो सर्व कला व शास्त्रें याचा आधारस्तंभ असून न्यायनिष्ठ असा जगाचा राजा आहे. त्याच्या कारकीर्दीत महेशपरंपरेंतील श्रीनिवृत्तीनाथाच्या शिष्यानें, म्हणजे ज्ञानदेवानें गीतेस मराठी साज चढविला. शके १२१२ मध्यें ज्ञानेश्वरानें ही टीका लिहिली व सच्चिदानंदबाबा मोठ्या आदरानें लेखक झाला." यावरून ज्ञानेश्वरी इ. स. १२९० मध्यें लिहिली असें दिसतें. पुढें तीनशें वर्षें ज्ञानेश्वरीची हस्तलिखित प्रतच पिढ्यानुपिढ्या लोकांच्या वाचण्यात आल्यामुळें तींत अनेक पाठभेद सहज निर्माण झाले व मूळ प्रतींत नसलेला कांहीं भाग जोडण्यात व मूळ प्रतींत असलेला कांहीं भाग गाळण्यांत आला असावा. पुढें इ. स. १५९० ( श. १५१२ ) मध्य श्रीएकनाथांनीं ज्ञानेश्वरीची प्रमाणभूत आवृत्ति अत्यंत काळजीपूर्वक तयार करण्याचें काम हातीं घेतलें. तेव्हापासून ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाचें नवें युग सुरू झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. पूर्वी हा ग्रंथ अति शुद्ध होता, परंतु, पुढें पाठांतरांत अशुद्ध झाला. तो शुद्ध करून, शोधुन प्रसिद्ध करण्याचें काम श्रीएकनाथांनीं अत्यंत आदरानें हातीं घेतलें. त्यांनीं मूळ प्रतींत मुळींच फेरफार केला नाहीं. जरूर तेथें मोठ्या कुशलतेनें शुद्ध पाठ घातले व हल्लीं उपलब्ध आहे या स्थितींत ज्ञानेश्वरी प्रसिद्ध केली. ज्ञानेश्वरीसारख्या अप्रतिम ग्रंथात जर कोणी एखादी ओवी घुसडून फेरफार करील, तर तें अमृताच्या ताटांत नरोटी ठेवल्याप्रमाणें होईल! म्हणून कोणीहि त्यांत बदल करूं नये असें श्रीएकनाथांनी बजावून सांगितलें आहे.

## ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा

ज्ञानेश्वरीच्या उपसंहारांत श्रीज्ञानेश्वरांनीं आपली गुरुपरंपरा दिली आहे, तिच्यात दंतकथात्मक भाग मुळींच नाहीं, असें म्हणतां यावयाचें नाही. कोणतीहि अध्यात्मपरंपरा ऐतिहासिक कामापलीकडे व स्मृतीच्या आवाक्याबाहेर नेली कीं, तिच्यांत कांहीं दोष राहाणें अगदीं अपरिहार्य होतें. "एकदा श्रीशंकर अध्यात्मरहस्य पार्वतीस सांगत

असतां, तें महासागरांतील एका मगरीच्या पोटांत दडून बसलेल्या मत्स्येंद्रनाथांच्या कानीं पडलें. या मत्स्येंद्रनाथांची व भग्नावयवी चौरंगीनाथांची सप्तशृंगीवर गांठ पडली. तत्क्षणीं तो सर्वांगीं संपूर्ण झाला. मग आपणास निर्विघ्नपणें समाधिसुख भोगता यावें म्हणून मत्स्येंद्रनाथांनीं गोरक्षनाथास हें परमार्थरहस्य सांगून त्याचा सर्व लोकांत प्रसार करण्याचें सामर्थ्य त्यांस दिलें. गोरक्षनाथांकडून तें अद्वयानंदवैभव अशा प्रकारें गहिनीनाथांना मिळालें. जगांतील सर्व लोक अज्ञानानें व पापानें बद्ध झालें आहेत हे पाहून गहिनीनाथाना दया आली व त्यांनीं तें ज्ञान श्रीनिवृत्तिनाथांना देऊन त्याच्याकडे पुढील कामगिरी सोंपविली. "आदिगुरु शंकरापासून शिष्यपरंपरेनें थेट आम्हांपर्यंत आलेलें हें आध्यात्मिक गुप्त ज्ञान आम्ही तुला सर्वच्या सर्व देतो. त्याचा तू स्वीकार कर व या जगांत कलीनें ग्रासलेल्या आर्त जीवाकडे धावून जा व त्याचें सर्व प्रकारें रक्षण कर." अशी आज्ञा श्रीनिवृत्तिनाथाना त्याच्या गुरूनें दिली. आधीच स्वभावतः कृपाळु, त्यांत अध्यात्मगुरूंची आज्ञा; तेव्हां वर्षाकालात मेघ खवळावा त्याप्रमाणें श्रीनिवृत्तिनाथाचा उत्साह दुणावला व त्या मेघाप्रमाणें आर्त लोकाना शांत करण्यासाठीं त्यांनीं अध्यात्मज्ञानाचा वर्षाव केला व 'शांत' रसाचा प्रवाह वाहू लागला. चातकाप्रमाणें श्रीज्ञानेश्वराना त्यातील थोडेच थेंब घेतां आले व येथें भगवद्गीतेवरील टीकारूपानें प्रकट झाले आहेत." येथें श्रीज्ञानेश्वरांनीं आपली अध्यात्मपरंपरा दिली आहे, ती थेट शंकरापासून मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनिनाथ व निवृत्तिनाथ या परंपरेनें श्रीज्ञानेश्वरापर्यंत आली व ज्ञानेश्वर हे श्रीनिवृत्तिनाथाचे शिष्य होते, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. श्रीज्ञानेश्वरांच्या इतर लिखाणात जे उल्लेख आले आहेत त्यांवरूनहि या परंपरेस दुजोरा मिळतो. ही गोष्ट खरी असली, तरी ज्ञानेश्वरीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथाच्या शेवटीं दिलेल्या या उल्लेखाचें महत्त्व केवळ अद्वितीय आहे यांत शंका नाहीं.

### श्रीज्ञानेश्वरांचा गुरुविषयीं आदर

श्रीज्ञानेश्वरांचें अंतःकरण गुरुभक्तीनें इतकें उचंबळून येतें कीं त्यांना आपल्या गुरुविषयीं वाटत असलेला नितान्त आदर वेळोवेळीं व्यक्त केल्याशिवाय राहवतच नाहीं. पहिल्या अध्यायात श्रीगुरूंच्या गुरुकृपेनें संसारसागर तरून जाण्यास आपणास मदत झाली असें श्रीज्ञानेश्वरानीं सांगितलें आहे. डोळ्यात अंजन घातल्याबरोबर वाटेल तें दिसूं लागतें व गुप्त धनहि तावडतोब दिसतें; चिंतामणी हातीं लागला तर आपल्या सर्व इच्छा पूर्ण होतात; त्याचप्रमाणें सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेनें व त्याच्यामध्यें आपल्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या असें श्रीज्ञानेश्वर म्हणतात. झाडाच्या मुळाशीं पाणी घातलें तर तें सर्व शाखांना व पानाना पोहोंचतें; समुद्रांत स्नान केलें तर जगातील सर्व तीर्थांत स्नान केल्याचें पुण्य मिळतें; अमृतसेवनानें जगातील सर्व स्वादिष्ट पदार्थांचें सेवन केल्यासारखें होतें; त्याप्रमाणें सद्गुरूची पूजा केली तर सर्व इच्छा पूर्ण होतात.

**गुरुकृपेस असाध्य कांहींच नाहीं.**

सहाव्या अध्यायात श्रीज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे कीं, "जें बुद्धीला आकलन करण्यास कठीण जातें तें श्रीनिवृत्तिनाथाच्या कृपाप्रसादानें सहज कळतें. अतींद्रिय अध्यात्म-ज्ञान प्राप्त झालें असता जें डोळ्यांस दिसत नाहीं तें डोळ्याशिवाय दिसूं लागतें. परीस हातीं लागला, तर जें किमया करणाऱ्यांनाहि सापडत नाहीं, तें सोनें लोखंडांतहि सापडतें; त्याप्रमाणें एखाद्यावर गुरुकृपा झाली, तर त्यास काय अशक्य आहे ? ही गुरुकृपा आपल्यास अपार लाभली आहे असे धन्योद्गार श्रीज्ञानेश्वरांनीं काढिले आहेत."

**५. गुरुकृपा अवर्णनीय आहे.**

गुरूचें वर्णन यथार्थ करणें अशक्य आहे असें श्रीज्ञानेश्वर म्हणतातः— "सूर्याच्या अंगास उटी लावणें, किंवा कल्पतरूला हार घालणें, किंवा कापुरास सुवास देणें, किंवा चंदनास चर्चिणें जसें अशक्य, त्याप्रमाणेंच गुरूचें वर्णन करणें अशक्य होय. अमृताचें पुनः शिजवून पक्वान्न करितां येईल काय ! मोत्यास चकाकी येण्यासाठीं रंग देण्याइतकें किंवा सोन्यास रुप्याचा मुलामा चढविण्याइतकेंच गुरूची स्तुति करणें अप्रयोजक आहे. म्हणुन मौन धरून मूकपणेंच सद्गुरूस नमन करणें श्रेयस्कर होय."

**गुरुकृपेचें आवाहन**

श्रीसद्गुरु हे श्रीज्ञानेश्वरांच्या विचारांचा सर्वस्वीं एकमेव विषय असून त्यांत ते कसे पूर्ण तल्लीन होतात हें त्यांनीं अनेक अध्यायांच्या आरंभीं प्रस्तावनेदाखल गुरुमहिम्याचें जें वर्णन लिहिलें आहे त्यावरूनहि सिद्ध होतें. उदाहरणार्थ बाराव्या तेराव्या, चौदाव्या व पंधराव्या अध्यायाच्या आरंभीं त्यांनीं सद्गुरूंची कृपा भाकिली आहे. बाराव्या अध्यायाच्या आरंभी सद्गुरूंच्या कृपादृष्टीनें विषयरूपी सापाच्या दंशानें आलेली मूर्छा निर्विष कशी होते, हें श्रीज्ञानेश्वरानीं सांगितलें आहे. "तुझ्या कृपाप्रसादाचा पूर लोटल्यावर संसारताप आम्हांस कसा पोळील किंवा जाळील ! गुरुमाउली आपल्या शिष्यास आधारशक्तीच्या मांडीवर कौतुकानें वाढवून व हृदयकोशांतील पाळणींत त्यास निजवून स्वतः झोके देते. ती तिच्यापुढें आत्मज्योति ओंवाळून मन-पवनाचीं खेळणीं करते व आत्मसुखरूपी बाळलेणीं त्याच्या अंगावरें घालते. सतराव्या कलेचें अमृतपावन देऊन, अनाहत नादाचा खुळखुळा ती हातीं देते व देऊन समाधिसुखांत निजविते." श्रीज्ञानेश्वर मराठी भाषेचे खरे प्रेमी होते. म्हणुन, "तुझ्या कृपेनें मराठी सारस्वतांत आत्मज्ञानाचें पीक वाढव" अशी विनवणा त्यांनीं आपल्या गुरूंस केली आहे. 'सद्गुरुस्तवन म्हणजे सर्व विघ्नाच्या नाशाचें आदिकारण असून त्याच्या नुसत्या स्मरणानें सर्व शब्दसृष्टि स्वाधीन होते व बोलण्यांत इतका गोडवा येतो कीं, त्यापुढें अमृत फिकें पडते' असा तेराव्या अध्यायाच्या आरंभीं श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या गुरुस्तवनाचा महिमा वर्णिला आहे. चौदाव्या अध्यायाच्या आरंभीं सद्गुरूस श्रीज्ञानेश्वरांनीं 'प्रज्ञाप्रभातसूर्य' म्हटलें आहे. त्याचा उदय

झाला असता विश्वाभास नाहींसा होतो व तो लपला तरच हें विश्व प्रकट होतें: "क्षितिजावर सूर्य उगवला कीं चंद्र निस्तेज काजव्यासारखा दिसतो, त्याप्रमाणें गुरुकृपेचा उदय झाला कीं सर्व शास्त्र निस्तेज होतात. गुरुमहिमा शब्दानीं वर्णन करणें कधींच शक्य नाहीं. म्हणून स्तुति सोडून निवांतपणें त्याच्या पायीं डोकें ठेवणें हीच त्याची यथार्थ स्तुति होय." पंधराव्या अध्यायाच्या आरंभीं श्रीज्ञानेश्वरांनीं गुरुकृपेचें रूपकात्मक वर्णन दिलें आहे: "आता मी सद्गुरूस बसण्यासाठीं आपल्या हृदयाचा चौरंग करून त्यावर माझ्या सद्गुरूचीं पावलें बसवितों. ऐक्यभावाच्या ओंजळींत सर्वेंद्रियांच्या कळ्या भरून घेऊन मी त्यांचें गुरुचरणीं अर्घ्य देतों. अनन्यभावाच्या पाण्यानें सर्व वासना धुवून स्वच्छ केलेल्या बोटानें मी गुरुपादुकास चंदन लावतो. आत्मज्ञानाचे सोन्याचे अलंकार मी त्याच्या चरणावर चढवितों व शुद्ध आनंदाचें अष्टदल कमळ वाहतों. मी अहंकाराचा धूप जाळतों, नाहंभावानें ओंवाळतों व समरसभावानें गुरुचरण निरंतर आलिंगितों."

### श्रीनिवृत्तिनाथ म्हणजे चित्सूर्यच होय.

आपल्या गुरूंबद्दल श्रीज्ञानेश्वरांना इतका निरतिशय आदर वाटतो कीं श्रीनिवृत्तिनाथाची कितीहि स्तुति केली तरी त्याच्या खऱ्या मोठेपणाचें यथार्थ वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात असें त्याना वाटलें. "एखाद्या दरिद्री मनुष्यास अमृताचा सागर दिसला तर त्यास उचिताचा विसर पडून, तो मामुली भाजीपाला देऊन त्या सागराचें आदरातिथ्य करण्यास धांवतो. येथें भाजीचें महत्त्व नसून, ज्या भावनेनें तो तो अर्पण करितो, तिचें महत्त्व फार आहे. त्याचप्रमाणेंच दिव्यतेज सागररूपी ईश्वरास तो काडवातींची आरती ओवाळतो, तेव्हां त्यामागें असलेल्या त्याच्या भक्तीचें महत्त्व जास्त आहे, हें लक्षात ठेवलें पाहिजे. मूल आईबरोबर नानाप्रकारें खेळतें. या खेळांच्या मुळाशीं आई जाणते, म्हणूनच तिला त्या खेळांमुळें फार संतोष वाटतो, एखादा लहानसा ओहोळ गंगेस मिळाला, तर तो केवळ ओहोळ आहे म्हणून त्याचा अव्हेर गंगा करील काय! हे श्रीनिवृत्तिनाथा! अशाच भावनेनें मी तुमची स्तुति शब्दांनीं करावी म्हणून पुढें सरसावलों आहें व ती अपुरी पडली तर तो एक पोरकट निष्पाप प्रयत्न आहे, असें समजून तुम्ही क्षमा करा!"

### श्रीज्ञानेश्वरांची नम्रता

आपण लिहिलेला ग्रंथ जगांतील सर्वोत्तम ग्रंथांपैकीं एक ठरणार याची तुम्हीं श्रीज्ञानेश्वरांना पूर्ण जाणीव आहे. तथापि, त्याच्या कर्तृत्वाचा अभिमान किंवा त्याचें श्रेय ते आपल्याकडे कधींच घेत नाहींत. "आपण चातक पक्षी असून चोंच वर करून तोंड उघडलें असतां निवृत्तिकृपामेघाचे कांहीं थेंब आपल्या तोंडांत पडले" असें श्रीज्ञानेश्वरांनीं म्हटल्याचें मागें सांगितलेंच आहे. श्रीज्ञानेश्वर

म्हणतात कीं, "देव अनुकूल असलें तर वाळूचींहि रत्नें होतात; देवाच्या मनांत आलें तर आघणात टाकलेल्या खड्याचाहि अमृताप्रमाणें गोड भात होतो. श्रीगुरूंनीं अंगिकार केला, तर सर्व संसारच मोक्षमय होतो. याप्रमाणेंच श्रीनिवृत्तिनाथाच्या कृपेनें माझ्या अज्ञानासच ज्ञानाच्या योग्यतेस आणून ठेवलें आहे." आपल्या ग्रंथरचनेस निवृत्तिगुरुकृपेप्रमाणेंच इतर संतांची कृपाहि कारणीभूत आहे याची पूर्ण जाणीव श्रीज्ञानेश्वरांना आहे. "अहो, आपणच पोपटाला पढविलेले शब्द तो वेळेवर बोलणार नाहीं काय ? अहो तुम्हीं संतानीच लावलेलें हें सारस्वताचें गोड झाड तुम्हींच अवधानामृत शिंपून मोठें केलें पाहिजे; म्हणजे तें रसभावानें फुलेल व नानार्थ फळभरानें फळाला येईल व तुमच्या कृपेनें जगास सुखाचें स्थान होईल. रामाच्या दैवी शक्तीनें प्रेरित झाल्यावर रानातील पाला खाणाऱ्या माकडांनीं लंकेश्वराचा नाश केला नाहीं काय ? श्रीकृष्णाच्या सामर्थ्यामुळें एकट्या अर्जुनानें अकरा अक्षौहिणी सैन्याचा फडशा पाडला नाहीं काय ?" 'महामुनि व्यास ज्या मार्गानें गेले त्याच मार्गाचा अवलंब करून केवळ त्यांचे अर्थपूर्ण शब्द मी मराठी भाषेंत केले आहे'. असें ज्ञानेश्वर म्हणतात. "श्रीव्यासाच्या कुसुममालेनें जर ईश्वर संतुष्ट झाला तर माझ्या दुर्वांकुराचा तो अव्हेर करील काय ? मोठमोठे हत्तीचे कळप पाणी पिण्यास क्षीरसिंधूच्या तटाकीं येतात, म्हणून तेथें यःकश्चित् सुरकुटास मज्जाव होईल काय ? राजहंसाचें चालणें सुंदर असलें, म्हणून त्यामुळें जगातील इतर प्राण्यांना चालण्यास प्रतिबंध आहे काय ? महासागरांत आकाश प्रतिबिंबित होतें, म्हणून तें डबक्यांत प्रतिबिंबित होण्यास कांहीं हरकत आहे काय ? त्याचप्रमाणें भाष्यकाराना वाट पुसत व्यासाचा मागोवा घेत मी हा मार्ग आक्रमणार आहे. शिवाय ज्याचें सामर्थ्य सर्व चराचर पृथ्वी व्यापून राहिलें आहे, अशा श्रीनिवृत्तिनाथांचा मी शिष्य नाहीं काय ? त्यांच्या शक्तीमुळेंच चंद्र आपल्या अमृतमय तेजानें जग निववीत नाहीं काय ? सूर्याच्या तेजात त्याचें सामर्थ्य भरून राहिलेलें नाहीं काय ? ते श्रीनिवृत्तिनाथ माझ्या अंतःकरणांत शिरून भरून राहिले आहेत, तेव्हां माझ्या प्रत्येक उछ्वासागणिक काव्य निर्माण होईल. गुरुकृपेनें काय साध्य होणार नाहीं ? आपण केवळ गुरूच्या हातांतले केवळ एक बाहुले आहोंत.



# नरहरी तल्लीन झाला !

लेखक : आत्माराम सावंत

**महाराष्ट्र ही शूरांची आणि संतांची भूमि आहे. वीर आणि भक्ति हे दोन रस ‘ इये मऱ्हाटीचिये नगरींत ’ शतकांनुशतकें हातांत हात घालून नांदत आले आहेत. या ‘ दगडफुलांच्या कणखर आणि कोमल देशांत ’ शिवछत्रपतींसारख्या अवतारी पुरुषानें परकीय सत्तेविरुद्ध जेव्हां लढ्याचें रणशिंग फुंकलें, तेव्हां निद्रिस्त समाजाला जागृत करण्याचें कार्य तुकोबा-रामदास यांच्यासारख्या संतांनींच केलें. ज्ञानोबापासून चोखोबापर्यंत समाजाच्या निरनिराळ्या थरांतून ही संतमंडळी पुढें आली आणि त्यांनीं भागवत धर्माची पताका सतत फडकत ठेवली. दुष्ट प्रवृति नष्ट करून सत्प्रवृत्तिची जोपासना करण्याची शिकवण समाजाला दिली. या महान् परंपरेतील एक उपेक्षित संत नरहरी सोनार यांची नुकतीच पुण्यतिथी झाली. त्यानिमित्तानें त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्याचा हा एक नम्र प्रयत्न.**

संत नरहरी सोनार यांना मी ‘ उपेक्षित ’ म्हटले ते त्यांच्या भक्तांना खटकण्याचा संभव आहे. पण दुर्दैवानें ती वस्तुस्थिती आहे. तेराव्या शतकांत होऊन गेलेल्या या संताचे नांव आज लोकांना ठाऊक आहे. शंकराची आरती करतांना आपण ‘ नरहरी तल्लिन झाला ’ असा गजर करतो. पण या नरहरीचे चरित्र आणि कार्य याबद्दल सर्वसामान्य मराठी माणसाला राहूं दे. पण खुद्द सुवर्णकार समाजांतील किती लोकांना माहिती आहे ! या प्रश्नाचे उत्तर निराशाजनकच आहे. याचें कारण इतर संताप्रमाणें या संताचे चरित्र आणि कार्य सांगणारें ग्रंथ आज उपलब्ध नाहींत ‘ अमृतानें पैजा जिंकणाऱ्या ’ या मराठी भाषेची जी सेवा या संतानें केली आहे, ती ‘ मालूतारण ’ या ग्रंथाच्या रूपानें आज पंढरपूरात हस्तलिखित स्वरूपांत बासनांत पडून आहे. त्यांचे अभंग फुटकळ स्वरुपांत ठिकठिकाणीं सांपडतात. पण हे सर्व साहित्य अद्याप पद्धतशीरपणें प्रकाशित होऊं शकलेले नाहीं. जनसामान्यांपर्यंत पोचलेले नाहीं.

‘ जग हे अवघे सारे एकरूप, सर्वांभुतीं एक पांडुरंग ’ असा महान संदेश ईश्वराच्या रुपांत भेद मानणाऱ्या शिव व विष्णुभक्तांना देणारे संत नरहरी सोनार

जन्माला आले ते एका शिवभक्त कुटुंबांत, त्यांची शिवभक्ती इतकी कट्टर होती कीं, पंढरपुरांत वास्तव्य करूनहि विठ्ठलाचें दर्शन त्यांनीं कधीं घेतलें नव्हतें. इतकेंच काय, पण विठ्ठल मंदिराचा कळस पहाणेंहि निषिद्ध मानले. भल्या पहाटे चंद्रभागेंत स्नान करून मल्लिकार्जुनाच्या मंदिरात (जेथें ते रहात असत) मल्लिकार्जुनाची मोठ्या भक्तिभावानें पूजा करणें हा त्यांचा नित्यनेम होता. सत्य ज्योतिर्लिंग बारा प्रातःकाळी स्मरण करा, कोटी कुळें उद्धारा, भव तरा बाप हो ' अशी त्यांची भावना होती.

## विठ्ठलभक्त कसा झाला ?

मग हा शिवभक्त विठ्ठलभक्त कसा झाला ? ती हकिकत कथन करण्यासारखी आहे. मल्लिकार्जुन मंदिरात तें आपला सुवर्णकाराचा व्यवसाय करीत कालक्रमण करीत असतानाच एक दिवस त्याच्याकडे दौलताबादचा एक बडा सावकार आला. पदरी विपुल संपत्ती असून संतति नाहीं, ती व्हावी म्हणून त्या सावकारानें विठ्ठलाला नवस केला होता. कालांतरानें त्याला पुत्ररत्न झाले. तेव्हा नवस केल्याप्रमाणें विठ्ठलाच्या कमरेंत रत्नजडीत करदोरा घालण्यासाठीं तो पंढरपूरास आला होता. नरहरी बुवा हे पंढरपुरातील अतिशय कुशल सुवर्णकार. रत्नजडित करदोरा तयार करण्याचे हें काम तेच उत्कृष्टरित्या करूं शकतील, असें त्या सावकाराला लोकांनीं सांगितलें. अर्थात् त्याबरोबर नरहरी हा कट्टा शिवभक्त आहे. तो विठ्ठलाचे दर्शन निषिद्ध मानतो हा पेंचहि लोकांनीं सावकारापुढें टाकलाच होता.

## पेंच सुटला, पण—

पण सावकार मनाशीं निर्धार करून नरहरीबुवाकडे गेला आणि त्यानें आपले काम त्यांना सांगितलें. शंभर होन घडणावळ त्याला नरहरीबुवांनीं सांगितली तीहि त्यानें आनंदानें कबूल केली. पण विठ्ठलाच्या कमरेचें माप कसें घेणार हा प्रश्न शिल्लक राहिलाच. त्यावर नरहरीबुवानी अशी तोड काढली, तुम्ही तुमच्या देवाच्या कमरेचे माप मला आणून द्या. त्याप्रमाणें मी करदोरा तयार करून देईन. सावकारानें हें मान्य केलें, त्याप्रमाणें विठ्ठलाच्या कमरेचे माप आणलें आणि त्या मापाप्रमाणें नरहरीबुवानीं सुदर करदोरा करून दिला. पण सावकारानें तो घेऊन जेव्हा जेव्हा विठ्ठलाच्या कमरेत घातला, तेव्हा तो सैल झाल्याचें त्याला आढळून आलें. सावकारानें नरहरीबुवांना जाऊन हें सांगितलें, नरहरीबुवांनीं कौशल्यानें करदोरा कमी करून दिला. पण नंतर तो घट्ट झाल्याचें आढळून आलें. असा प्रकार कांहीं वेळा झाला, तेव्हां सावकार नरहरीबुवांना म्हणाला, “तुम्ही कसेंहि करून माझ्यासाठीं प्रत्यक्ष विठ्ठलाकडे येऊन त्याचें माप तुमच्या हातानी घ्या ' नरहरीबुवांना हें कसें शक्य होणार ! शेवटीं ते डोळे बांधुन विठ्ठलासमोर येण्यास तयार झाले, त्याप्रमाणें वस्त्रानें सावकारानें त्यांना विठ्ठल मंदिरांत नेलें. हातानीं चांचपून नरहरीबुवा विठ्ठलाचें माप घेऊं लागले, तो त्याच्या हातांना शंकराच्या मूर्तीचा भास झाला. ते म्हणाले, हें

काय ? तुम्ही मला माझ्या देवाकडे आणलंत ? तेव्हां सावकार म्हणाला, ' नाहीं हें विठ्ठल मंदिरच आहे. ही विठ्ठलाची मूर्ती आहे. ' विश्वास न बसल्यानें नरहरीबुवांनी डोळ्यावरील वस्त्र बाजूला सारून पाहिलें आणि विठ्ठलाची मूर्ती दिसतांच पुन्हा वस्त्र डोळ्यावर घेतले. पुन्हा माप घेऊं लागले. पुन्हा तोच प्रकार, शंकराच्या मूर्तीचा भास. नरहरीबुवांना काहीं कळेना. त्यांनीं शिवशंकराची करुणा भाकली आणि हा काय प्रकार आहे तें सांगण्याची प्रार्थना केली.

## पांडुरंग प्रगटला

तेव्हां पांडुरंगानं दर्शन देऊन त्यांना सांगितलें, ' अरे मीं आणि शंकर एकच आहोत. शिव श्रेष्ठ आणि मी विष्णू कनिष्ठ अशी जी तुझी समजूत आहे, ती चूक आहे. तूं माझा आवडता भक्त आहेस, तुला येथें आणण्यासाठीं मीच मुद्दाम हा उपाय योजला.

तेव्हां नरहरीबुवांना पश्चात्ताप झाला. पांडुरंगाचे पाय धरून त्यांनी क्षमा मागितली आणि करदोरा घातला. तो विठ्ठलाच्या कमरेस बरोबर बसला.

शिव आणि विष्णु नाहीं तेथें भेद, सदा ते मनी अभेद यज्यांच्या
तयांच्या चरणी सोनार नरहरी प्रणीत करी दंडवत '

असें तिथून पुढें नरहरीबुवा म्हणूं लागले. यानंतर त्यांचे मन पूर्णपणें भक्तिमार्गाकडे वळले. ते व्यवसायांत व संसारांत रमेना.

' कांहीं करीना उपाय, दिवसेंदिवस व्यर्थ जाय,
संसारी नाहीं समाधान, न चुकवी जन्म–मरण '

अशी व्यथा ते आपल्या अभंगांतून व्यक्त करूं लागले आणि शेवटीं या महान संताच्या भक्तिपूर्ण जीवनाचा ग्रंथ इ. स. १२०७ मध्यें माघ वद्य तृतीयेस आटोपला.

## आम्हांला हें शोभत नाहीं

आज या महान् संताचे जे चरित्र आणि साहित्य उपलब्ध आहे ते पद्धतशीरपणे प्रसिद्ध होणें आवश्यक आहे. खुद्द सुवर्णकार समाज सध्यां सुवर्णनियंत्रणाच्या पेरणीखालीं चेंगरला आहे. त्या दुःखातूनहि मन शांत करून आपल्या या महान् पूर्वजाच्या ऋणातून अंशतः उतराई होण्याचें हें कार्य त्यांनी हाती घेतले पाहिजे. सरकारनें त्यांना याबाबतींत योग्य तें सहाय्य केले पाहिजे. महाराष्ट्राच्या महान संतपरंपरेतील हा संत आतांहि असाच उपेक्षित राहिला तर तें आम्हांला शोभणार नाहीं. [ मराठा ]

## बाबांची कृपा—एक अनुभव

सौ. सुशीला मंगेशराव कोरगांवकर, कोटक इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, राजकोट ह्या आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात—

माझा हा अनुभव जवळ जवळ दहा वर्षांपूर्वीचा म्हणजे सन १९५६ सालचा आहे. त्यावेळीं आम्ही वीसनगरला होतों. त्यावेळी माझी तिसरी मुलगी माझ्या घरचें सर्वांत लहान मूल होतें. तिचें नांव सुषमा. सुषमा त्यावेळीं जवळ जवळ चार वर्षांची होती. तिला डांगेखोकला झाला होता. त्या आजारानें ती फारच अशक्त झाली होती. शेवटीं शेवटी एक महिना ती दूध वगैरे कांहींहि पीत नव्हती, व सर्व दिवसभर झोपून राही. ती तिची स्थिति पाहून मला फार भीति वाटे. एक दिवस तर तिच्यामुळें मला अतिशय वाईट वाटून रडूं आलें, व मी अंतःकरणपूर्वक श्रीसाईबाबांची करुणा भाकली आणि विनवणी केली. "बाबा! तुम्हांला जर हिला जिवंत ठेवावयाची असेल तर हिला ठीक ठेवा. नाहींपेक्षां तिला घेऊन जा. तिचे हाल माझ्यानें पहावत नाहींत." असें म्हणून मी हात जोडले.

तो काय चमत्कार! दुसऱ्या दिवशीं पहाटेस सुषमा मला बोलली, "माई! थोडेसें मला दूध दे." लगेच तिला मी गरम दूध दिलें. तें ती मटकन प्याली, व त्यावेळेपासून तिला आराम पडला. चि. सुषमा आतां १० वींत शिकते. त्यावेळेपासून हा अनुभव श्रीसाईलीलेंत देण्याची माझी इच्छा होती.

---


लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# भारताचें थोर भाग्य

अंतःकरण भरून येईल असें लक्ष्मणाचें चरित्र वाचल्यानंतर रामायणाच्या वाचकांचे विचार आणि दृष्टि क्षणभर रुद्ध होते. लक्ष्मणाच्या जीवनांत प्रेम हा स्थायी भाव होता. लक्ष्मणाचें रामावर प्रेमासाठीं प्रेम होतें आणि भरताचें राम ही कर्तव्यनिष्ठ आणि धर्मप्रिय व्यक्ति आहे म्हणून त्याच्यावर प्रेम होतें.

रामानंतर मुख्य चरित्र कोणाचे ? तर 'भरताचें,' असेंच आपल्याला म्हणावें लागेल. लक्ष्मण हा रामाची सावली होता. लक्ष्मणाला स्वतंत्र व्यक्तिमत्वच नाहीं लोक स्वतःचें सामान्य व्यक्तित्व सुद्धां विलीन करूं शकत नाहींत. परंतु लक्ष्मणानें स्वतःचें असामान्य व्यक्तित्व रामांत एकरूप केलेलें होतें. म्हणून रामानंतर भरताचेंच चरित्र मुख्य चरित्र म्हटलें पाहिजे. स्वतःचा अपराध नसतांना सुद्धां लहान भावासाठीं रामानें अयोध्येच्या राजगादीचा त्याग केला. यांत रामाला समाधानाचा आनद आहे. रामचरित्राशीं संवादी असें भरताचें व्यक्तिचित्र आहे. प्रखर, भव्य आणि उदात्त असूनहि लक्ष्मणाच्या चरित्राचा रामायणावर जो परिणाम झालेला नाहीं, तो भरताच्या चरित्राचा झालेला आहे. भरताचें चित्र वाल्मीकींनीं संवादी अशा स्वरूपात चित्रित केलेलें आहे.

लहान भावासाठीं राज्य सोडून रामानें चित्ताचें समाधान प्रदर्शित केलेलें आहे, परंतु त्यापेक्षांहि मनाचा जास्त मोठेपणा, भरतानें स्वतःला राज्यगादी प्राप्त झालेली असतांनासुद्धां मोठ्या भावाकरिता तिचा त्याग करून दाखविला आहे. जणूं दोघांच्यामध्यें त्याग आणि निर्लोभिता याची शर्यतच लागलेली आहे ! अशा तऱ्हेची शर्यत रामायणांतच पहावयास मिळते. जगातील तत्वचिंतकसुद्धां या चरित्राचें जीवनमाधुर्य पाहून विस्मित झालेले आहेत–"They could not imagine that it was possible for any two brothers to love and respect each others so much." 'I do not want, says one and pushes it off; the other just touches it and says, I don't want either' and pushes it back. दोघेही नकार देतात ही आश्चर्याची गोष्ट आहे. राज्यलोभ, आणि लाभ यांकरितां चाललेली स्पर्धा जगाच्या इतिहासांत पहायला मिळते. परंतु सर्वस्वाच्या त्यागाची स्पर्धा–स्वात्मार्पणाची स्पर्धा तर वाल्मीकीसारख्यांची प्रतिभाच निर्माण करूं शकते. जगांत ज्याप्रमाणें राज्याकरितां भांडण चालतें त्याप्रमाणें या ठिकाणीं सुद्धां दोघांचा झगडा राज्याकरितां सुरू आहे, परंतु एक म्हणतो कीं, 'तूं घे,' आणि दुसरा म्हणतो 'छे, तूं घे.' भांडणांत केवढी दिव्यता आहे ! राज्यासाठीं अशा तऱ्हेचा दिव्य झगडा दुसरीकडे कोठेंही पहायला मिळणार नाहीं, त्यासाठीं तर वाल्मिकी-रामायणच उघडावें लागेल.

चारित्र्यनिष्ठा, कुलाभिमान आणि निष्ठा हे तीन गुण भरताच्या जीवनांत होते. भरताचें रामावर जें प्रेम होतें तें चारित्र्याच्या दृढतेमुळें होतें. भरत आजोळाहून अयोध्येंत आला आणि त्याला समजलें कीं, राम वनात गेला आहे. त्या वेळीं तो रडायला नाहीं लागला. भरताचें रामाच्या चारित्र्यावर प्रेम होतें, राम या व्यक्तीवर नव्हे हें ध्यानांत ठेवून भरतानें त्या वेळीं उच्चारलेले श्लोक वाचा. त्यानें सांगितलें कीं, "माझ्या वडिलांनीं रामाला वनांत पाठवलें याबद्दल मला दुःख वाटत नाहीं. वडिलांनीं रामाला वनांत पाठविलें त्याचें कारण इक्ष्वाकुवंशांतल्या राज्याधिकाऱ्यांच्या चारित्र्यांत नक्की भ्रष्टता आली असेल; नाहींतर वडिलांची काय ताकत आहे कीं रामाला वनांत पाठवितील !" अर्थात् 'चारित्र्यभ्रष्टता आणि अधःपतन यामुळें रामाला वनात पाठविलें असेल,' असें वाटल्यामुळें त्याला दुःख झालें. रामाला वनात दुःख भोगावें लागेल म्हणून भरताला दुःख झालें नव्हतें, तर रामाला भरतानें चारित्र्यसंपन्नतेमुळे आदर्श मानले होते, त्या आदर्श मूर्तीचा भंग झाला असे वाटून भरताला अतिशय दुःख झालें. रामावर त्याची आत्यंतिक निष्ठा होती. ज्याला आपण आजपर्यंत चारित्र्यवान म्हणून मानलें होतें, तो आपला आदर्श चारित्र्यहीन आहे, हें समजतांच कोणाला दुःख होणार नाहीं ! भरताला झालेलें दुःख या प्रकारचें होतें. परंतु कैकेयीनें त्यावेळीं सांगितलें कीं, 'रामाला याकरितां वनात जावें लागलें नाहीं. जर राम चारित्र्यभ्रष्ट झाला असता तर घटनेप्रमाणें (Constitution) त्याला जावें लागलें असतें; परंतु तुला राज्य मिळावें म्हणून मी त्याला जंगलांत पाठविलें. तुझ्यासाठींच मी ही मेहनत घेतली.' त्यावेळीं......

हें ऐकून भरतावर वज्रघात झाला. त्याला वाटलें कीं, 'राम हा चारित्र्यवान आहेच, परंतु मी मात्र चारित्र्यभ्रष्ट झालों–प्रत्यक्ष नव्हे 'Direct, तर Indirect,' अप्रत्यक्षरीतीनें मी दोषी झालों. म्हणून चारित्र्यसंपन्न आदर्शमूर्ति रामाजवळ मी आतां कोणत्या तोंडानें जाऊं ! अनंत काळपर्यंत लोक म्हणत राहाणार कीं, गादीसाठीं झगडा ज्या इक्ष्वाकुकुलात दहा पधरा पिढ्यात झाला नाहीं, तो भरतामुळें निर्माण झाला. याचें कारण मी होणार ! राज्यलोभ, कुलाभिमानाची हानी, चारित्र्यभ्रष्टता वगैरे विचार माझ्यामुळें माझ्या माथीं बसणार व ही गोष्ट इतिहासांत नोंदली जाणार, आणि त्यामुळेंच तर तो अतिशय दुःखी झाला. या वेळीं सुद्धां कुलाभिमान, चारित्र्यनिष्ठा आणि कर्तव्यनिष्ठा हीं लक्षात घेऊनच भरत म्हणाला कीं, "माझ्यामुळें माझ्या आईच्या मनांत हें सर्व आलें. हें खरोखर माझें दुर्दैवच होय." यावरून भरत किती बुद्धिनिष्ठ आणि चारित्र्यनिष्ठ होता, तसेंच कर्तव्यनिष्ठेवर त्याचे किती प्रेम होतें हें दृष्टीस पडतें. भरताला जें दुःख झालें तें अतिशय दिव्य होतें. राम शीलसंपन्न आहे आणि मी परंपरेनें कां होईना शीलभ्रष्ट झालों. आता माझ्या आदर्शासमोर उभें राहाण्याची

माझी योग्यता नाहीं, तर मग मी त्याच्याशीं बोलू तरी कसा ? हें भरताच्या दुःखाचें वैशिष्ट्य भरताच्या चारित्र्याशीं समरस झाल्याशिवाय ध्यानात येणार नाहीं.

भरत हा व्यक्तिनिष्ठ नसून तत्त्वनिष्ठ होता. परंतु भरताच्या हृदयांत तत्त्वनिष्ठेवर असलेले प्रगाढ प्रेम तत्कालीन कोणीही व्यक्ति ओळखू शकली नाहीं आणि त्यामुळेंच त्याच्या दुःखावर आणखी डागणी मिळाली. ज्याची त्याला कल्पनाहि नव्हती त्या गोष्टींत लोक त्याला नांवें ठेवूं लागले. शुद्ध मन आणि शुद्ध हृदयाच्या भरताला लोक ओळखूं शकले नाहींत. भरत कौसल्येजवळ गेला त्यावेळीं कौसल्येनें त्याच्यावर आरोप केला. कौसल्या म्हणते, 'इदं ते राजकामस्य लब्धं राज्यकण्टकम्। राज्यकारभाराची इच्छा असणाऱ्या भरता ! तुला निष्कंटक राज्य मिळालें आहे.' अशा तऱ्हेनें मनांत राज्यलोभ नसतांनाहि त्याच्यावर त्याचा आरोप केला जात होता. त्याच्या मनांत काय असेल हें त्याच्यासारख्या परिस्थितींत असणाऱ्याला समजेल. 'राज्यकाम' हा शब्द भरताला भाल्यासारखा सलूं लागला. तो म्हणतोः—माझें डोकें काटून टाका पण मला 'राज्यकाम' म्हणूं नका. अशा तऱ्हेचा विचार भरताच्या मनांत कधीं आलेलाच नव्हता. त्यामुळें हें ऐकून भरतानें अतिशय शोक केला. 'अशा तऱ्हेचा विचार माझ्या मनात कधीं आला असेल तर मला वासिष्ठ आणि अरुंधती यांना मारण्याचें पाप लागेल' अशा हजारों शपथा त्यानें घेतल्या. तो खरोखर तत्त्वनिष्ठ होता. तो म्हणतो, माझ्या ठिकाणीं परंपरेनें शीलभ्रष्टता आली आहे, माझ्या आईच्या मनांत सुद्धां मी असल्या-मुळेंच अशा तऱ्हेचे विचार आले. या अनर्थाचें कारण मी झालों. मी जन्मालाच न आलों असतों तर ! पण ताबडतोब त्याच्या मनात विचार येतो कीं, 'मी या आईच्या पोटीं जन्माला आलों म्हणून मला रामासारखा भाऊ मिळाला.' बंधूंनो ! चारित्र्यावर केवढा सुसूक्ष्म डाग ! एवढा सुद्धां डाग ज्याला सहन होत नाहीं त्याची चारित्र्याची कल्पना आणि चारित्र्यनिष्ठा केवढी अलौकिक असेल याचा तुम्हीच विचार करा. जे विचार त्याच्या स्वप्नांतही आले नव्हते त्यामुळें लोक ज्या वेळीं शंका घेऊं लागतात त्यावेळीं त्याला केवढें दुःख होत असेल ! त्याला जीवनांत फारच सहन करावें लागलें आहे. ज्याचें मन स्वच्छ असतें त्यालाच अशा तऱ्हेचा पश्चात्ताप होतो. कपडा मळल्या-नंतर ते कपडे वापरणारा जो असेल त्याला वाटेल तिथें डाग पडला तरी त्याची थोडीच परवा असते ! परंतु स्वच्छ कपडे असणारा माणूस कपड्यांना डाग पडूं नये म्हणून किती जपतो ! कोळशाचा दुकानदार कपडे मळतील म्हणून पर्वाच करीत नाहीं. परंतु आपण लॉन्ड्रीमध्यें धुतलेले इस्तरीचे कपडे जर घातलेले असतील तर डाग पडूं नये म्हणून किती जपतों आणि संभाळून, आंग चोरून आजूबाजूला पाहून किती काळजी घेत असतों ! भरताच्या शुद्ध हृदयावर जखमांवर जखमा होत आहेत.

कौसल्येसारखी स्त्रीसुद्धा ज्यावेळीं त्याच्यावर आक्षेप करूं लागते, त्यावेळीं त्याला वज्राघात झाल्यासारखें वाटतें. तो म्हणतो—'कैकेयीला मारूनच टाकतों, परंतु रामासारखा

मनुष्य मला चारित्र्यभ्रष्ट म्हणेल, त्यावेळीं मंत्र्यानें सत्तेनें सांगितलें, राज्यावर बस नाहीं तर अराजक होईल.' त्यावेळीं भरत म्हणाला, मोठ्या भावाना दूर करून मी गादीवर बसूं, हें इक्ष्वाकु वंशांत कुलव्रत नाहीं. जो माझा मोठा भाऊ कुलव्रताचें पालन करण्यासाठीं जंगलांत गेला आहे, त्याला सोडून मी गादीवर बसणार नाहीं. अयोध्येच्या गादीवर रामाचा हक्क आहे.' ऋषिसत्तासुद्धां त्याला गादीवर बसायला सांगते. भरत नकार देतो तो म्हणतो; 'रामाला मी परत आणीन' आणि रामाला आणण्याकरितां जातो.

रस्त्यात भरताला जंगली लोकांचा राजा गुह भेटतो.

वनांत जाण्याच्या आदल्या दिवशीं त्याचा राम पाहुणा झाला होता. त्याला रामाविषयीं प्रेम होतें. त्याला वाटलें कीं भरत दुष्ट बुद्धीनें येत आहे. राम आणि लक्ष्मण यांना मारायला जात आहे. तोसुद्धां भरतावर आक्षेप घेतो. शुद्ध अंतःकरणावर खोल जखमा होत होत्या.

पुढें जातांना विद्वान् आणि सत्यमूर्ति अशा भरद्वाजांसारख्या तपस्वी ऋषींच्या मनात सुद्धां अशाच तऱ्हेचे विचार येतात. त्यांनीं सुद्धां राम लक्ष्मणांना वनात शांततेनें राहूं द्यायचें नाहीं का ? असा आक्षेप घेऊन प्रश्न केला. अशा तऱ्हेचे तपस्वी असें विचारतात, मग सामान्य लोकांनीं भरताविषयीं शंका घेतली तर त्यात काय आश्चर्य ? परंतु भरद्वाजाना ज्या वेळीं भरताचें अंतःकरण कळलें त्या वेळीं त्यांनीं भरताला नमस्कार केला आणि आनंदित अंतःकरणानें म्हणाले कीं, 'माझें सर्व तप तुझ्या पाठीशीं उभें आहे.' अशा तऱ्हेनें तत्कालीन समाज भरताचें हृदय ओळखूं शकला नाहीं. भरताला संपूर्णपणें ओळखणाऱ्या दोनच व्यक्ति होत्या. एक राम आणि दुसरे वसिष्ठ.

दशरथाला सुद्धा त्याविषयीं शंका होती. आईचे गुण मुलांत येणारच—'उन्मादो मातृदोषेण पितृदोषेण मूर्खता'—ज्याची आई अशी आहे तिच्या मुलांत कांहींतरी दुर्गुण असणारच. दशरथानें तर इथपर्यंत सांगितलें होतें कीं, 'भरत जर गादीवर बसला तर त्याला माझें श्राद्ध करायला सांगू नका.' भरताची अशी ज्वलंत भूमिका आहे कीं दशरथानें पण असें म्हणायला हवें होतें कीं, 'भरत राज्य घेणार नाहीं.' परंतु हेंच त्याचें दुर्दैव होय. तो इतका सच्छील असून त्याचे वडीलसुद्धां त्याचेविषयीं विश्वास दाखवूं शकले नाहीत.

परंतु वसिष्ठ आणि राम यांनीं मात्र भरताला पूर्णपणें—आमूलतः ओळखलें होतें. वसिष्ठ म्हणतात, "कैकेयी ! मी तुला निश्चित सांगतों कीं ज्यासाठीं हे तुझे सर्व प्रयत्न आहेत, तो भरत राज्य स्वीकारणार नाहीं. तो कधींही राजगादीवर बसणार नाहीं." वसिष्ठांसारखे म्हणतात म्हणजे प्रमाणपत्रच Certificate मिळालें. रामानेंसुद्धां तितक्याच विश्वासानें सांगितलें. भरतावर रामचंद्रांचा खूप विश्वास होता; त्याचें दुसरें हृदय भरत होता. भरत एक अत्यंत उत्कृष्ट व्यक्ति आहे एवढेंच नव्हे, तर राम आणि भरत एकच आहेत अशी त्यांची

दृष्टि होती. त्यामुळेंच राम ज्या ज्या वेळीं वनांत जायला निघाला त्यावेळीं लोकानीं रामाला प्रश्न विचारला कीं, 'आमचें रक्षण कोण करणार?' असा प्रश्न विचारल्यानंतर रामानें त्यांना सांगितलें, "भरत आहे ना? तो माझ्यासारखाच आहे. कोणावरही अन्याय करणार नाहीं. माझेंच चैतन्य भरताचे ठिकाणीं आहे. तो तुमचें रक्षण करील." Senior राम गेला तरी Junior राम आहेच. रामानें पंधरा श्लोकांत भरताचें वर्णन केलें आहे. राम म्हणतो, "लिहून ठेवा कीं भरत निष्काम आहे. तो प्रजेच्या धर्मांचें पालन करील आणि प्रजेला सुख देईल."

भरत जंगलांत जातो. त्या वेळीं लक्ष्मण शंकित होतो, राम नाहीं. इक्ष्वाकु कुलांतला ध्वज पाहतो त्या वेळीं लक्ष्मणाला वाटतें कीं, 'भरत रामाला मारायचें बाकी राहिलेलें काम पुरें करण्याकरिता येत आहे.' त्या वेळीं राम सांगतो, "तूं भरतावर नव्हे तर माझ्यावर वाक्प्रहार करीत आहेस, म्हणुन जरा विचार कर. तुला राज्य हवें असलें तर तुला मी देतो. भरत मला मारण्याकरितां नव्हे, तर आमंत्रण देण्यासाठीं आलेला आहे." केवढा विलास! धन्य भरत!

अयोध्या; किष्किंधा आणि लंका हीं तीन महान् राज्यें रामकालात होतीं. रावण आणि बिभीषण यांचा संबंध पहा, वाली आणि सुग्रीव यांचा संबंध पहा, भरत आणि राम यांचा संबंध पहा, म्हणजे कौटुंबिक प्रेमाच्या उच्चतेची कल्पना तुम्हांला येईल. बिभीषण रामाजवळ येतो आणि रामाला सांगतो 'रावण माझा भाऊ अशा प्रकारचा आहे' त्यावेळीं राम म्हणतो,

**'न सर्वे भ्रातरस्तात! भवन्ति भरतोपमाः!'**

'भरतासारखा भाऊ सर्वांनाच प्राप्त होत नाहीं' असें भरताला फक्त दोघेच जण समजत होते. बाकीच्या सर्वांना स्वतःची विशुद्धता आणि पावित्र्य याची ओळख करून घेण्यासाठी भरताला चौदा वर्षें तपश्चर्या करावी लागली. भरतानें राज्याचा त्याग केला त्या वेळीं लोकाना कळलें कीं, या दोन भावांची लाभासाठीं नव्हे तर त्यागासाठीं स्पर्धा आहे.

बिभीषणाला राज्य दिल्यानंतर दोनचार दिवस पाहुणचार स्वीकारावा असें बिभीषण रामाला सांगतो. त्यावेळीं राम म्हणतो, 'दोनचार दिवस काय, परंतु एक क्षणसुद्धां मी राहूं शकणार नाहीं. भरताला भेटण्यासाठीं माझे प्राण खालीवर होत आहेत. त्याला भेटायला एक दिवस जर उशीर होईल, तर तो प्राणत्याग करील, आणि नंतर मीहि जिवंत राहाणार नाही! भरताचें माझ्यासाठीं तपस्येचें व्रत चालू आहे, म्हणून मी तातडतोबच जाणार. मला पाहुणचाराची आवश्यकता नाहीं.' असें बोलून राम तत्क्षणींच निघुन गेला! रामाला माणसाची चांगली पारख होती. रुपयाचा खणकन् आवाज आल्यावर रुपया खिशांत टाकणारा नव्हता.

रामावर भरताचें अमर्याद प्रेम होतें. भरत गुहाला विचारतो, 'भाऊ, वहिनी, कुठें

बसली होती ! त्यांनी काय काय कपडे घातले होते ? कुठें झोंपत होती ?' गुह सांगतो– " इथें, जमिनीवर. " हें ऐकून भरत म्हणतो, ' जमिनीवर ! ' आणि प्रतिज्ञा करतो कीं, " आजपासून मी पण जमिनीवरच झोंपणार. " नंतर कधींही अंथरुणावर झोंपला नाहीं. रामाला भेटला त्या वेळीं गाईचें वासरूं सकाळच्या वेळीं दूध पिण्यासाठीं जसें जातें तसा भरत धांवत धांवत जातो आणि रामाच्या पायावर लोटांगण घालतो. वाल्मीकींना या प्रसंगाचें किती वर्णन करूं हें सुचत नाहीं. त्यांनीं या दोघांचा स्वभाव फारच सुंदर रीतीनें रंगविला आहे. वाल्मीकींच्या लेखणीतून वाहाणारा प्रेमप्रवाह पाहायचा असेल तर रामायणच उघडावें लागेल.

भरत व्यक्तिनिष्ठ नव्हताच; तो तत्त्वनिष्ठ होता. कर्तव्यनिष्ठा, चारित्र्यनिष्ठा आणि कुलाभिमान यावरच तो जगत होता. तो बुद्धिवादी होता. लक्ष्मणासारखा भावनाप्रधान नव्हता. लक्ष्मण भावनाप्रधान होता. रामाजवळ लक्ष्मण बोलूंच शकत नसे. परंतु भरत बुद्धिप्रधान होता. त्याची बुद्धि तर्ककर्कश होती. राम ज्याप्रमाणें बुद्धि चालवून कर्तव्या-कर्तव्याचा निर्णय घेऊं शकत असे, त्याप्रमाणें भरतही निर्णय घेत असे. भरत रामाला परत येण्याची विनंती करतो. त्यानें रामाला समजविण्यासाठीं जे कोटिक्रम केले, ते वाचण्या-सारखे आहेत. दोघेही परस्परांमध्यें कोटिक्रम करतात. भरतानें अनेक प्रश्न विचारून रामाला हैराण करून टाकलें होतें. लक्ष्मण रामासमोर कोटिक्रमच करूं शकत नसे.

राम कोण आहे हे भरत चांगल्या तऱ्हेनें ओळखत होता. कर्तव्यनिष्ठ माणसें कर्तव्याविषयीं निष्ठुर बनतात.

' वज्रादपि कठोराणि मृदूनिकुसुमादपि' भरताला हें माहीत होतें कीं, अश्रूंनीं रामाचें हृदय द्रवणार नाहीं. म्हणून तो रामाशीं बुद्धिवाद करीत होता.

भरत म्हणतो–' आईला खुष करण्यासाठीं जंगलांत आलास हें ठीक केलेंस आईला समाधान झालें आहे. परंतु आता तेंच राज्य संतोषानें तुला द्यावें अशी आईची इच्छा आहे, म्हणून हें सर्व राज्य तुझ्या चरणीं समर्पित करीत आहे. त्याचा तुम्ही उपभोग घ्या.'

रामसुद्धा तत्त्वज्ञानाचा आश्रय घेऊन उत्तर देतो कीं, " मी केवळ तुझ्या आईच्या समाधानासाठीं जंगलांत आलों आहे आणि त्याच आईच्या समाधानासाठीं पुन्हा अयोध्येला येईन ही तुझी समजूत चुकीची आहे. " सुखदुःख तर कर्माप्रमाणें मिळत असतें. सुख आणि कर्तव्य याच्या प्रश्नांत सुखाच्या पाठीमागेंच धांवणें यांत माणुसकी नाहीं. कर्तव्यामागेंच धांवलें पाहिजे, असा बुद्धिमान् मनुष्य विचार करील. आपणा दोघानाहि मान्य अशा वडिलांचें आज्ञारूप कर्तव्य पालन करण्यासाठीं मी जंगलांत आलों आहें. कर्तव्यपालनात सुखदुःखांचा विचारच येत नाहीं. भरताचे असे अनेक कोटिक्रम रामानें अशा तऱ्हेनें बुद्धिपूर्वक तत्त्वज्ञानाच्या योगानें खोडून काढले, परंतु तेवढ्यानें भरत कांहीं थांबेना.




## जानेवारी १९६६

या महिन्यांत भक्तांची गर्दी नेहमींप्रमाणें होती. रविवार व गुरुवार व सुट्टीचे दिवस बरीच गर्दी होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन**

ह. भ. प. गोपाळबुवा खांडेकर, पुणें, सं. गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांची कीर्तनें नेहमींप्रमाणें झालीं.

**गायन**

श्री. भोलानाथ रामनाथ समेळ, गिरगांव, मुंबई.

श्री. जयवंत बाळकृष्ण कुलकर्णी, विलेपारले, मुंबई ५७.

कुमारी इंदूमति नामदेव गोरे, मुंबई.

श्री. एम्. एल. बी. रमणन बिल्लीवाकम् ( मद्रास )

**व्हायवोलियन वादन**

श्री. शांतिलाल मणिशंकर भट सी. पी. टँक, मुंबई २.

**तबलावादन**

श्री. विजय नामदे

**भजनपार्टी**

सन्सारे भजन गायन

**२६ जानेवारी**

साईसंस्थान नोकर सेवेकरी गांवांतील प्रतिष्ठित नागरिक व बाहेरगांवाहून आलेले साईभक्त या सर्वांनीं मिळून साईनाथ हॉस्पिटल डॉ. पिंटोसाहेब यांचे अध्यक्षतेखालीं झेंडावंदन झालें.

ता. २६ जानेवारी रोजीं दुपारीं ४ वाजतां श्री साईसमाधी मंदिरांतील सभामंडपांत ऑल इंडिया साईसमाज मद्रासचे प्रमुख कै. बी. व्ही. नरसिंहस्वामी यांच्या फोटोचा अनावरण समारंभ इंदुर येथील साईभक्त मे. म. तथा बाळासाहेब रेगे रिटायर्ड हायकोर्ट जज्ज यांचे अध्यक्षतेखालीं हा समारंभ झाला. प्रथम कै. बी. व्ही. नरसिंह-

स्वामी यांचा फोटो गांवांतून मिरवून सभामंडपांत आणला. नंतर कै. बी. व्ही. नरसिंह-स्वामी यांनी श्री साईबाबांची कीर्ति अखिल भारतांत पसरविली. म्हणून त्यांचें गुणगौरवात्मक भाषण अध्यक्षांनीं केलें व हा गोड समारंभ आटोपला. या समारंभा-करितां मद्रासहून बराच स्त्रीपुरुष साईभक्तमेळा जमला होता.

**दुखवटा**

भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री अचानक निधन पावल्यामुळें संस्थानचे कोर्ट रिसीव्हर मे. पोतनीससाहेब यांनीं सर्व नोकर-लेवेकरी यांची सभा घेऊन श्री साईनाथमहाराज यांना प्रार्थना करून त्यांचे आत्म्यास शांति मिळावी म्हणून श्रद्धांजलि अर्पण केली व सर्वांनीं उभे राहून मूक प्रार्थना केली व संस्थानतर्फे दुखव-ट्याचा ठराव पाठविण्यांत आला.

साई संस्थानांत पूर्वी मॅनेजर म्हणून काम केलेले अनुभविक गृहस्थ श्री. खडकव-कर हे नगर मुक्कामीं ता. २९ जानेवारी रोजीं साईचरणीं विलीन झाले.


**मोठ्यांच्या भेटी**

मे. ना. शेषराव वानखेडे, अर्थमंत्री ( महाराष्ट्र राज्य )
मे. एम्. व्ही. देव, सेक्रेटरी शिक्षण खातें ( महाराष्ट्र राज्य )
मे. एम्. बी. रेगे, रिटायर्ड हायकोर्ट जज ( इंदूर )
मे. व्ही. गोपाळराव, डे. कमिशनर एक्साईज ( आंध्र प्रदेश )
मे. टी. पी. घोगले, प्रेसिडेंट सेल्स टॅक्स ट्रीब्युनल
मे. पीटर अल्वारीस ( खासदार )

**साईसंस्थान नोकर भजन मंडळ**

या महिन्यात दोन वेळां भजनाचा कार्यक्रम घेणेंत आला. पुष्कळशा नोकरांना आतां तालसुरांत भजन म्हणतां येऊं लागलें आहे.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.



## मुंबई कचेरींतील कार्यक्रम

दसऱ्यानिमित्त मुंबई येथील कचेरींत श्रीमती नाचणे यांचें ज्ञानेश्वरीवर प्रवचन तसेंच श्री. भा. बा. नाचणे यांचें प्रवचन व हनुमान प्रा. भजन मंडळींचे भजन वगैरे कार्यक्रम झाले.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality | | by Pradhan | १-०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगारकरकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. घोड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपीत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | Spiritual Symphony | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | Side lights on Sai Baba | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | Guide to Shirdi | (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: वी. जी.